मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८१  संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०)  मार्च २०१०

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार.

दि. २५ डिसेंबर २००९ ला मराठे प्रतिष्ठानचा दैनंदिनी प्रकाशन समारंभ आणि पुणे शाखेचा वर्धापन दिन संपन्न झाला. त्या कार्यक्रमाला आपण एकत्र जमलो होतो. सौ. अनुराधाताई प्रभुदेसाई यांच्या कार्यक्रमामुळे आपण प्रभावित झालो आणि देशभक्तीने भारावलेल्या वातावरणात, सद्य परिस्थितीत आपले कर्तव्य काय याचा विचार करायला आपण प्रवृत्त झालो, असो.

आपला 'हितगुज'चा अंक जास्तीत जास्त वाचनीय व्हावा म्हणून विविध विषयावरील साहित्य प्रकाशित करण्याचा माझा प्रयत्न असतो. श्री. अ. द. मराठे यांचा 'होळी रे होळी' हा होळीची मूळ संकल्पना विशद करणारा, श्री. आनंदराव मराठे यांचा एक ट्रेक : हुकलेला हा रोमांचकारी, थोडासा अद्‌भुत असा प्रवासवर्णनाचा अविस्मरणीय अनुभव असलेला लेख, 'माहेरच्या अंगणात' मुक्तपणे विहार करून आकाशात भरारी घेणाऱ्या माहेरवाशिणीची कर्तबगारी कुमुद डोके यांच्या मोकळेपणाने लिहिलेल्या वर्णनात वाचायला मिळेल.



दि. २५ डिसेंबर, २००९ रोजी पुणे शाखेच्या ३० व्या वर्धापनदिनाच्या दिवशी मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून सक्रिय सदस्य असलेले गोव्याचे श्री. कालिदास मराठे यांच्या हस्ते २०१० च्या डायरीचे प्रकाशन

'प्रतिष्ठान वृत्त' मुळे मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीत कशा स्वरूपाचे काम चालते हे समजते. दिनांक १५ जानेवारीला मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तभ श्री. वा. ग. मराठे यांच्या पुणे येथील निवासस्थानी कार्यकारिणीतील सदस्यांनी वास्तूप्रकल्पावर चर्चा केली. काही चांगल्या योजना आखल्या. दिनांक १४ जानेवारीला आदल्या दिवशीच संक्रांतीचा सण होता. संक्रांती म्हणजे संघ-क्रांती. कोणत्याही महान उद्दिष्ट असलेल्या महान कार्याला संघटनेची आवश्यकता असते. संघटनेमध्ये एक प्रकारची शक्ती असते, कारण कोणतेही काम करायला घेतले तर एकटा माणूस अपुराच पडतो. म्हणून संघटित केलेले काम शक्तीसंचय करण्यास उपयोगी पडते. (सध्याच्या शक्तीप्रदर्शनाच्या काळात आपण वावरत आहोत.) हे मराठे

(पृष्ठ ४ वर)

संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१

दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल prabhakar_marathe@yahoo.com

अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे

## आदि शंकराचार्य स्थापित

# चारधाम यात्रा

व्दारका,बद्रिनाथ,जगन्नाथपूरी,रामेश्वर

सोबत:सोमनाथ,हरिव्दार,कोणार्क,मदूराई

संपूर्ण वर्षात एकच यात्रा


सहल खर्च रुपये :१६,६०० फक्त

रेल्वे व विमान प्रवास भाडे अधिक

**दि-२४जून ते ४जुलै**

हरिव्दारला गंगा पूजन करुन

रामेश्वराला अर्पण करण्याची सुर्वणसंधी




नावं नोदंणी - दि-२०मार्च पर्यंत

## क्रांतिवीरांचे बलिदान पहायलाच हवे

# अंदमान

4nt/5dys थेट विमान प्रवास

**रु.9090/-फक्त**

विमान भाडे अधिक Group discount rs.1000/-

**5april/12&26may**

आम्ही हॅवलॉक दाखवत नाही

मुंबई व पुणे येथून रेल्वेने नेणारी राजेश रानडे यांची लोकप्रिय

# अंबाजोगाई दर्शन यात्रा

सोबत परळी वैजनाथ

सहल खर्च **रुपये १८०० स्लिपर क्लास तिकीटासहित**
**रुपये २७०० एसी तिकीटासहित**

दर महिन्याच्या प्रत्येक शुक्रवार व शनिवारी निघते

आगाऊ बुकिंग किमान १५ दिवस अगोदर

सर्व खर्च समाविष्ठ

नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क

आयोजक **राजेश रानडे**

अनोळखी जगाची ओळख

# TOURWAYS

022 65 281 281

92232 73496

C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

www. tourways.in

# मराठे प्रतिष्ठानचा ३०वा वर्धापनदिन आणि पुणे शाखा दैनंदिनी २०१० चा प्रकाशन समारंभ

- सौ. नीलांबरी मराठे (पृ.२८०)

मराठे प्रतिष्ठानचा ३०वा वर्धापन दिन आणि २०१० च्या डायरीचा प्रकाशन समारंभ असे दोन्ही कार्यक्रम २५ डिसेंबर २००९ रोजी गांधर्व महाविद्यालयाच्या हॉलमध्ये पुणे शाखेतर्फे आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्नल प्रमोदन मराठे व श्री. गजानन मराठे यांनी तयार केलेल्या प्रश्नावलीवर आधारित ऐच्छिक आयत्या वेळची सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत २५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. ही स्पर्धा कै. चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. गजानन मराठे यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेचा निकाल याच अंकात वाचायला मिळेल.

सामान्यज्ञान स्पर्धा चालू असताना ज्यांनी या स्पर्धेत भाग घेतला नव्हता अशा कुल-बांधवांसाठी कर्नल प्रमोदन मराठे यांनी एन्टेलकी टेक्नोलॉजीज तर्फे तयार करण्यात आलेली शैक्षणिक वेबसाईट दाखवली. ती अतिशय उत्कृष्ट व बोधप्रद होती. ७ वी ते पदवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ती उपयुक्त आहे. आपण कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा, आपण कोण व्हावं? काय करावं? यासारखे अनेक विचार विद्यार्थी व पालकांच्या मनात सतत रूंजी घालत असतात, कारण त्यांना शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातल्या सर्व वाटा माहीत नसतात. ज्या वाटा माहीत असतात त्या वाटेने जाण्यासाठी आवश्यक शारीरिक, मानसिक व बौद्धिक कुवत आपल्यामध्ये आहे की नाही याची जाण नसते. त्यामुळे शैक्षणिक व व्यावसायिक मार्गाची निवड कशी करायची? स्वत:ला कसे घडवायचे? अडचणींना सामोरे कसे जायचे? अशा अनेक गोष्टींवर उदाहरणे देऊन या वेबसाईटमध्ये मार्गदर्शन केले आहे. याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे कर्नल प्रमोदन मराठे यांनी आवाहन केले.

ही वेबसाईट व सामान्यज्ञान स्पर्धेनंतर प्रारंभी सौ. नीलांबरी मराठे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात कु. तनया प्रशांत मराठे हिच्या शिवस्तुती व गणेशवंदना या नृत्याविष्काराने झाली. तनयाच्या नृत्यामध्ये लय व ताल यांचा सुरेख संगम असल्यामुळे वातावरण उल्हसित झाले.

या बहारदार नृत्यानंतर स्टेजवर अध्यक्ष श्री. आनंद मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, संस्थापक श्री. वा. ग. मराठे, हितगुजच्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा मराठे, कार्यवाह श्री. मोहन मराठे व श्री. कालिदास मराठे या सर्वांना स्टेजवर स्थानापन्न होण्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात आली व त्यानुसार स्टेजवर सर्व मान्यवरांना बसवण्याची कार्यवाही झाली

सौ. नीलांबरीने प्रास्ताविक केले. या प्रास्ताविकात डायरी काढण्याचा उद्देश सांगितला. की मराठे प्रतिष्ठानला ३० वर्ष झाली परंतु अद्याप प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू झालेली नाही. त्या संदर्भात मुंबईमध्ये खूप प्रयत्न झाले, परंतु मुंबईतल्या किंमतीमुळे ते यशस्वी झाले नाहीत. त्यामुळे आता प्रतिष्ठानची वास्तू पुण्यात करण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे दरवर्षी डायरीतून जे पैसे मिळतात ते इमारत निधीमध्ये घालून जागा घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे हे महत्त्वाचे काम आपण सर्वांनी मिळून करायचे आहे. ज्यांना एकरकमी पैसे देणे शक्य आहे त्यांनी अवश्य द्यावे. परंतु एकरकमी पैसे देणे सर्वांनाच शक्य होत नाही म्हणून पुणे शाखेच्या कार्यकारिणीतील १५ सदस्यांनी दरमहा १००० रु.ची भिशी सुरू केली आहे. कोणताही कुलबांधव या भिशीमध्ये सामील होऊ शकेल. किंवा विभागवार काही कुलबांधवांनी एकत्र येऊन त्यांची स्वतंत्र भिशी सुरू करावी असे आवाहन केले.

मराठे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू लवकरच होईल. त्यामुळे त्या वास्तूत ठेवण्यासाठी श्रीमती शालिनीताई मराठे यांनी ज्ञानेश्वरांची सुंदर मूर्ती मराठे प्रतिष्ठानाला भेट देण्याचे ठरवले आहे. त्या आजच देणार होत्या, परंतु ती मूर्ती ठेवायला आज स्वतंत्र जागा नाही त्यामुळे वास्तू झाल्यावर ती मूर्ती नक्की आम्ही वास्तूमध्ये ठेऊ असे नीलांबरीने सांगितले. यावर सौ. सुमेधाताईंनी ज्ञानेश्वरांची मूर्ती शालिनीताईंना मराठे प्रतिष्ठानाला का द्यावीशी वाटत आहे याचे थोडक्यात विवेचन केले.

त्या म्हणाल्या, ''पुण्यात मंदिरांची वानवा नाही, असंख्य मंदिरे, देवळे आहेत, पण काकूंनी मराठे प्रतिष्ठानला श्री ज्ञानेश्वरांची मूर्ती भेट म्हणून दिली. कारण मराठे प्रतिष्ठान-विषयी वाटत असणारी आत्मीयता, प्रेम आणि जिव्हाळा.''

ज्ञानेश्वरांची मूर्ती भेट म्हणून मिळणं हे म्हणजे प्रतिष्ठानला प्रसाद मिळण्यासारखी आहे.

यानंतर मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून सक्रिय सदस्य असलेले गोव्याचे श्री. कालिदास मराठे यांच्या हस्ते २०१० च्या डायरीचे प्रकाशन झाल. स्टेजवरील मान्यवरांना डायऱ्या देण्यात आल्या. जाताना कुलबांधवांनी आपल्या डायऱ्या घेऊन जाव्या असे सांगितले.

यानंतर श्री. अरुण मराठे यांच्या हस्ते अध्यक्षांचा श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते स्टेजवर बसलेल्या इतर मान्यवरांचा श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट, चेक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये प्रसाद विजय मराठे, वरूण वसंत मराठे, मृणाल मधुसूदन मराठे, अमेय जयप्रकाश मराठे व ऐश्वर्या अजेय मराठे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सत्कारार्थीचे पुष्पगुच्छ सौ. सुवर्णा मराठे यांनी स्वत: तयार केले होते,

यानंतर हितगुज संपादिका डॉ. सौ. सुमेधा मराठे यांनी हितगुजचे नवीन स्वरूप, त्यासाठी येणारा खर्च व वाढती महागाई या सर्वांची सांगड

घालून अंक काढावा लागतो. त्यामुळे हितगुज राखीव फंड निधीसाठी जास्तीत जास्त सदस्यांनी उदारहस्ते मदत करावी असे आवाहन केले.

या आवाहनानंतर आजच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेल्या सौ. अनुराधाताई प्रभुदेसाई यांचा 'ऋणानुबंधन जवानाचे' या व्याख्यानासोबत स्लाईड शो झाला. त्यांची भाषा इतकी ओघवती व भावपूर्ण होती की त्यामुळे सर्व श्रोते भारावून गेले होते. त्यांनी दाखवलेल्या स्लाईडस् इतक्या स्पष्ट होत्या की जणू काही आपण लडाख, कारगिल मध्येच आहोत असा भास होत होता. सैनिकांचे कष्टप्रद जीवन ते कसे जगतात. देशातील सामान्य माणूस सुरक्षित राहावा म्हणून सैनिक किती हालअपेष्टा सहन करतात हे त्यांच्य बोलण्यातून वारंवार जाणवत होते. सामान्य माणसाला दु:ख, संकटं आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सैनिकांची आठवण होत नाही. सत्य परिस्थितीची जाणीव झाल्यावर प्रत्येक सामान्य माणसाची मान शरमेने खाली गेली व प्रत्येकाने सैनिकांसाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला हे प्रकर्षाने जाणवले.

जवानांनी कारगिल व लडाखमधील शिखरे जिंकण्यासाठी कसे कष्ट केले. तहान लागल्या-वर बर्फ ओठावर ठेवून कशी तहान भागवली. सर्व संकटांना ते कसे शौर्याने सामोरे गेले याची कहाणी सांगताना अनुराधाताई व श्रोत्यांच्या डोळ्यांतूनही नकळत अश्रू ओघळले. आणि श्रोत्यांनी साश्रूनयनांनी वीरमरण आलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. योगायोगाने अनुराधाताईंचा आजचा ५०वा कार्यक्रम होता.

या भारावलेल्या कार्यक्रमानंतर एकदम धार्मिक वातावरणात जाऊन श्री. अमरनाथ चक्रदेव यांनी नवरात्रातील अष्टमीच्या महालक्ष्मी उत्सवाची फिल्म दाखवली. यात प्रारंभीच्या सुवासिनींची सार्वजनिक पूजा, आरती, प्रसादाचे जेवण, संध्याकाळी तांदळाच्या मुखवट्याची उभी केलेली महालक्ष्मी, तिच्या भोवतालची आरास, घागरी फुंकणे, भाविकांची दर्शनासाठी व स्त्रियांची ओटी भरण्यासाठी लांबच लांब रांग अशा सर्व गोष्टींचा त्यात समावेश होता. जरा उशीर झाल्यामुळे या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा प्रतिसाद जरा कमी मिळाला म्हणून वाईट वाटले.

आपले एक कुलबांधव श्री. अरविंद वासुदेव मराठे यांना नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली या संस्थेच्यावतीने भारतीय उद्योगरत्न हा पुरस्कार मिळाला म्हणून सर्व उपस्थितांना त्यांचे सन्मानचिन्ह दाखवून त्यांचा पुष्पगुच्छ व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर ठाण्याच्या एका कुलबांधवांनी दिलेला मटार उसळ, ब्रेड, बेसनाचा लाडू व कॉफी या अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

गांधर्व महाविद्यालयातील हॉलच्या बाहेर सौ. माधवी जाईल यांनी लोणच्याच्या खाराचा व सौ. शुभदा मराठे यांनी ज्वेलरीचा स्टॉल लावला होता. त्यालाही महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

या शानदार कार्यक्रमासाठी पुणेकर तर होतेच, परंतु मुंबई कार्यकारिणीचे अनेक सदस्य, सांगली, कऱ्हाड, आगाशी, गोवा येथूनही काही कुलबांधव व भगिनी आवर्जून उपस्थित होते. त्या सर्वांना मनापासून धन्यवाद!

**सौ. नीलांबरी रमेश मराठे, पुणे ( पृ.२८० )**

**- श्री. वा. ग. मराठे, पुणे. (पृ. ५०३)**

---

*(पृष्ठ ४ वर)*

# संपादकीय

प्रतिष्ठानचे आधारस्तंभ असलेल्या श्री. वा. ग. ना कळले, उमजले आणि म्हणून त्यांनी पुण्या-मुंबईतील मराठे कुलबांधवांना एकत्र जमवले आणि वास्तूप्रकल्पाचे – मराठे प्रतिष्ठानला स्वत:ची वास्तू असावी याचे स्वप्न डोक्यात तरळत ठेवून ते लवकरच प्रत्यक्षात साकार व्हावे म्हणून प्रयत्न करण्याचे निश्चितपणे ठरविले गेले. तेव्हा सर्व मराठे कुलबांधवांनी यासाठी हातभार लावावा आणि लवकरात लवकर मराठे प्रतिष्ठानी स्वत:ची सुसज्ज वास्तू उभी राहावी ही मनापासूनची शुभकामना व्यक्त करते.

आपली शुभचिंतक,

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ. १२०)**

(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)

---

## नांदा सौख्यभरे

श्री. रविंद्र भगवान विद्वांस यांचे चिरंजीव श्री. राहुल यांचा शुभविवाह सौ. मंजिरी वासुदेव जोशी, मु.पो. आंजर्ले हिजबरोबर दि. २७ नोव्हेंबर २००९ ला सकाळी १२ वाजून २६ मिनिटांनी लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, कल्याण येथे थाटामाटात संपन्न झाला.

सौ. मंजिरी ही बी.कॉम., फर्स्टक्लास, एमकॉम पहिला भाग फर्स्टक्लास असून मुलुंड येथे चार्टड अकाउंटच्या फर्ममध्ये नोकरी करते. (आता सासरचे नाव सौ. सोनाली असे ठेवले आहे.) तर चि. राहुल हा नोकरी सांभाळून फोटोग्राफीचा व्यवसाय करतो. तसेच तो चित्तपावन ब्राह्मणसंघाचा कार्यकर्ता म्हणूनही काम करतो. मराठे प्रतिष्ठानद्वारा वधूवरांना हार्दिक शुभेच्छा!

**खापरपणजोबा शिवराम अंताजी मराठे यांच्या स्मरणार्थ**

सीए प्रभाकर मराठे (पृ.१२०) वडाळा, मुंबई ४०० ०३१

सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

# होळी रे होळी (होळीची मूळ संकल्पना)

**श्री. अ. द. मराठे, डोंबिवली**

होळीचा सण म्हटला की त्याचे सामान्यत: स्वरूप असे असते - फाल्गुनाच्या पौर्णिमेला गावातील सर्व लोक एका मोकळ्या मैदानावर जमतात. एक तोडलेले झाड सर्वजण मिळून नाचवीत सर्व गावात फिरवतात. नंतर ते मैदानात उभे करतात. त्याच्या बाजूला थोड्या अंतरावर गवत, लाकडे, गोवऱ्या यांचा ढीग करून पेटवतात. उभ्या केलेल्या झाडापुढे एक दगड असतो. घराघरातून आलेले आणि नवसाचे नारळ त्यावर फोडतात. त्यांचा प्रसाद घराघरातून वाटतात. हे सर्व चाललेले असताना बोंबा मारणे, परंपरेने चालत आलेल्या होळीच्या 'फाका' सामुदायिकपणे उच्चारणे, गुह्येंद्रियाचा वारंवार उच्चार करणे. गावातील प्रतिष्ठितांची नावे गुंफून त्यांच्या गुप्त भानगडींचा उखाण्यातून उच्चार करणे हे मनसोक्त चाललेले असते. या सणात अश्लील भाषा आणि बीभत्स चाळे मुक्तपणे चालतात. आणि हे सर्व गंभीरपणे आणि धार्मिक विधी समजून फक्त त्या एकाच दिवशी चालते. पुढे काही दिवस सोंगे निघतात. खरे तर हे सर्व लोकपरंपरेतील धार्मिक विधीच आहे! त्यामागे एक गंभीर सांस्कृतिक धारणा आहे. ती आहे स्वर्गधरेच्या मीलनाची. ही धारणा विसरली गेली असली तरी विधी मात्र निष्ठेने पार पाडला जातो.

हिंदू परंपरेत वर्षाचे सहा ऋतू मानले आहेत. ऋतु या शब्दाचा एक अर्थ स्त्रीची मासिक पाळी असा आहे. ही अवस्था गर्भधारणक्षमतेचे लक्षण आहे. अगदी याच अर्थाचे शब्द आहेत - पुष्पावस्था, कुसुमावस्था, रजोवस्था. रज म्हणजे पराग. वनस्पतीला पुष्पावस्था प्राप्त झाली की ती फळ धारण करणार-फळणार- हे उघड आहे. या क्रियेत पुष्पातील पराग महत्त्वाचे आहेत. म्हणजेच पृथ्वीला वर्षातून सहा वेळेला 'ऋतू' प्राप्त होतात. आणि ती गर्भ धारण करते. हा गर्भ असतो फळे, फुले, भाज्या, धान्य आणि गाई, बैल, म्हशी, बकऱ्या इ. दूध. मांस देणारे प्राणी आणि अंडी, मांस देणारे पक्षी यांचा. पृथ्वीची ही गर्भधारणा योग्यप्रकारे होण्यावर मानवी जीवन अवलंबून आहे. पृथ्वीच्या ठिखाणी गर्भ ठेवणारा आहे सूर्य. या सूर्याचे आणि पृथ्वीचे मीलन होणे हा केवळ हिंदूच नव्हे तर जगातील सर्व संस्कृतींच्या सणांचा, यज्ञांचा, प्राण्यांना बळी देण्याच्या विधींचा गाभा आहे.

होळीच्या सणाचे रहस्य जाणून घ्यायचे असेल तर आपल्याला अश्वमेध यज्ञाची थोडी माहिती घ्यावी लागेल. हा यज्ञ करण्यापूर्वी राजा एक घोडा सर्व दिशांना फिरवून आणत असे. नंतर त्याला 'शांत' करीत म्हणजेच ठार मारीत. तो मृत घोडा सोन्याच्या एका चकतीवर ठेवून त्याच्या शेजारी राणीला झोपवित. नंतर तो घोडा आणि राणी यांच्यातील संवादाचे मंत्र म्हटले जात. या मंत्रांची भाषांतरे वाचली तर असे लक्षात येते की हे मंत्र म्हणजे राणी आणि घोडा यांच्या संभोगाचा अश्लील वाटावे असे वर्णन आहे. या सर्व विधीचे रहस्य असे - घोडा हा सर्व दिशांना व्यापणाऱ्या सूर्याचा प्रतिनिधी आहे. सोने हे सूयाचे प्रतीक आहे. त्यावर घोड्याला झोपवून सूर्याचे हे प्रतीक अधिकच सधन करीत. राजा हा पृथ्वीपती. साहजिकच राणी ही पृथ्वी ठरते. अशा तऱ्हेने सूर्यपृथ्वीच्या मीलनाचा हा बनाव घडवून तो मंत्रसामर्थ्याने वास्तवात आणला जात असे.

आता होळीचा सण बघा. अग्नी हा सूर्याचा पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे. तो प्रज्ज्वलित करून आणि त्याच्यासमोर गुह्येंद्रिय, संभोग या अर्थी शब्द उच्चारून पृथ्वीसूर्य मीलन घडवून आणीत. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी उच्चारल्या जाणाऱ्या अश्लील शब्दांना मंत्रांचे सामर्थ्य असते असे मानले जाते. आजच्या भाषेत बोलाचे तर या सणाच्या रूपाने सूर्यपृथ्वी मीलनाचा कार्यक्रम सर्व मिळून 'स्पॉन्सर' करतात.

तोडलेले झाड मिरवून उभे करतात. त्याला शक्रध्वज म्हणजे इंद्राचा झेंडा असे म्हणतात. इंद्र हा पर्जन्यवृष्टीचा देव. आणि पृथ्वीच्य सुफलनासाठी त्यालाही प्रसन्न करण्याचा हा प्रघात मूळ कार्यक्रमात समाविष्ट केला असे दिसते.

होळी नंतर गोमूचे खेळे, कोळणीचे नाच, झोयझतारीचे नाच, संकासुर आणि इतर देवदेवतांची, राक्षसांची सोंगे हे कार्यक्रमसुद्धा या सणाचाच भाग आहेत. ते कदाचित पृथ्वी या 'न्हाणुलीचे' मनोरंजन म्हणून होत असतील.होळी हा सण खरे म्हणजे अत्यंत गंभीरपणे सामुदायिकरित्या साजरा केला जाणारा धार्मिक विधी आहे. या सणाच्या आचारात भूमातेविषयीचा अपार आदर आणि कृतज्ञताभाव अभिप्रेत आहे. मनातील काही विकृतींना मोकळे करून मन स्वच्छ करण्याचा परिणामही यातून होतो. मात्र हा भाव आता विशेषत: शहरात नष्ट होत असून विध्वंस आणि उपद्रव या भावना अधिक पुढे येत आहेत. सूर्यापृथ्वी मीलन ही कल्पना विज्ञानाने कालबाह्य ठरवली आहे. त्यामुळे आता या सणाला नवा आशय देणे आवश्यक आहे. तो आशय निसर्गरक्षणाला उद्युक्त करणारा आणि पृथ्वी या आपल्या ग्रहाविषयी आपुलकी वाटणारा हवा. हा सण साजरा करणाऱ्या प्रत्येकाला 'पृथ्वीसाठी मी काहीतरी करतो आहे.' असे वाटले पाहिजे. पूर्वीच्या 'अडाणी' लोकांना ते तसे वाटायचे.

**- अ. द. मराठे,**
६, मंजूषा, विकास हाऊसिंग सोसायटी,
शास्त्रीनगर, डोंबिवली (प) - ४२१ २०२

**नांदा सौख्यभरे**

चि. आर्चिस रविंद्र मराठे, पुणे यांचा शुभविवाह शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २००९ ला सकाळी १२ वाजून २१ मिनिटे या शुभमुहूर्तावर चि. सौ. कां. नेहा राजीव काळे हिच्याबरोबर पुणे येथील अरोरा टॉवर्स, ''चॅन्सरी'', मोलेदिना रोड, कॅम्प या स्थळी थाटामाटात संपन्न झाला.

'हितगुज'ची लेखिका आणि चित्रकार कुमुद डोके (मराठे) यांचे हे भाचे आहेत.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!

# एक ट्रेक : हुकलेला

**श्री. आनंद मराठे, ठाणे (पृ. २७७)**

चंद्रतालच्या ट्रेकला जायचे बरेच दिवस मनात घोळत होते. बहुतेक जण हा ट्रेक व्हाया बाताल जीपनी करतात. आम्ही उभयतांनी मात्र हा चालत करायचा ठरवला होता.

अखेर तो योग जुळून आला. आणि आम्ही दोघं मनालीला पोहोचलो. गोकुळला फोन केला. दुसऱ्या दिवशी ताट, वाट्या, चमचे इत्यादी आवश्यक वस्तू भाड्याने घेतल्या. तसेच सहा दिवसांसाठी लागणारा शिधाही घेतला म्हणजे कणीक, डाळ, तांदूळ, अंडी, चहा, कॉफी इ. सर्व तयारी करून संध्याकाळी हॉटेलवर परत आलो.

सकाळी ७ वाजता गोकुळ आमचा गाईड व मित्र, आचारी पूरणमल, एक घोडेवाला, एक छोटू (वरकामाचा मुलगा) यांना तसेच तंबू वगैरेसह हॉटेलवर हजर झाला. आमचा ट्रेक चालू झाला. मनालीपासून ४ कि.मी.वर असलेल्या प्रिमी गावाला आम्ही पोहोचलो. प्रिमीपर्यंतचा सर्व रस्ता शहरातलाच असल्याने आरामात पोहोचलो. प्रिमीला नाश्ता करून सामान घोड्यावर नीट बांधून आमची सहा जणांची वरात पुढे निघाली.

साधारणत: तास-सव्वातास बेताचा चढ असलेल्या डोंगरातल्या पायवाटेने चालताना मस्त मजा येत होती. हास्यविनोद, थट्टामस्करी करत सफर चालू होती. आणखी अर्धा तास चालल्यावर लक्षात आलं, की पुढचा प्रवास खडतर आहे. संपूर्ण रस्ता दगडांनी भरलेला आहे. चढही जरा जास्तच कठीण आहे, पण हवा मस्त होती. सर्वत्र गर्द झाडी असल्यामुळे उन्हाचा त्रास होत नव्हता. दुपारी २च्या सुमारास आम्ही 'सेतन' या खेड्यात पोहोचलो. आता पुढील चार दिवसांत आम्हाला एकही गाव लागणार नव्हते. तसेच लोकांचे दर्शनही होणार नव्हते. 'मनाली'ला बांधून घेतलेले सँडविचेस खाऊन, पंधरा मिनिटं विश्रांती घेऊन आम्ही पुढे निघालो.

पुढचा रस्ता दिव्यच होता, पण मजा येत होती. गर्द झाडी त्यामुळे सूर्यप्रकाशही जेमतेम खालपर्यंत पोहोचत होता. साधारणत: ५च्या सुमारास एका नाल्याच्या शेजारी आमचे तंबू लागले. मुक्कामाच्या जागेला 'पांडूरोपा' म्हणतात. या जागेला 'पांडूरोपा' असे म्हणतात, कारण वनवासात असताना पांडवांनी या जागेवर काही काळ राहून शेतीसुद्धा केली होती. इथे पोहोचताच आमचा आचारी पूरणमलनी आम्हाला सर्वांना मटार सोलायला बसवले. ६वाजता सूप, ६.३०ला 'मेन'कोर्स व नंतर डेझर्टर्स असा जंगी बेत होता. हा ट्रेक पायी करणारे ९५% लोक हे गोरे असल्यामुळे या ट्रेकमधील डिनर हे ४ कोर्सचे असते. ७.३० ला सर्वांच्या तंबूचे दार म्हणजे झिप बंद. हळूहळू आठच्या सुमारास थंडीचा जोर वाढला. आम्ही दोघंही आपापल्या स्लिपिंग बॅगमध्ये गुडुप झालो. रात्रीत दोनदा बाहेर जायचा प्रसंग आला, पण स्लिपिंग बॅगमधून तंबूच्या बाहेर जाणे म्हणजे एक अग्निदिव्यच होते. तशी फारशी नीट झोप लागलीच नव्हती. आणि रात्री अचानक घुंगरांचे आवाज आले आणि भीती वाटली. पण नंतर असे समजले की या प्रदेशातील गद्दी (धनगर) रात्रीच्या वेळी शेळ्यांना घेऊन एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगरावर चरण्यासाठी नेतात. नंतर पुढे चार दिवस याची सवय झाली.

सकाळी ४.३०वाजता गोकुळची हाक आली, ''अंकल, बेडटी तयार'. ५.३० च्या सुमारास दिसू लागल्यावर कूच केले. पहिले दोन तास रस्ता चिखल, असंख्य दगड-धोंड्यांनी भरलेला होता. त्यातून मार्ग काढणे कठीण होत होते. त्यात आणखी किड्यांची भर होती. त्यांचाही त्रास होत होता. ७.३०च्या सुमारास नाश्ता करून निघालो. पुढचे चार तास चालणे म्हणजे एक अवर्णनीय अनुभव होता. रस्ता साफ, हलकाच चढ. हवेत मानवेल एवढाच गारवा. एकूण सर्व आनंदाचा भाग होता. १२.३० च्या सुमाराला थोडसं खाऊन 'ज्वारा'ला जाण्यासाठी निघालो. 'ज्वारा'च्या अलीकडे २ कि.मी. वर नाल्यावरील छोटासा पूल वाहून गेला होता. आमच्या आधी गेलेल्या कुठल्यातरी टीमने त्यावर एक मोठे झाड टाकून तात्पुरता रस्ता तयार केला होता. आम्ही मात्र गोकुळच्या मदतीने ते १०फूट अंतर पार केले. साडेतीनच्या सुमारास 'ज्वारा'ला एका ओढ्याच्या काठी परत सर्व तंबू लागले. आणि ४ वाजता पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे दोन तास तंबूत बसून काढावे लागले. साडेसहाला सूप व पुढील ४ कोर्स डिनर व साडेसातला आपापल्या तंबूत बाळा जो जो रे. फक्त पाऊस पडल्यामुळे हवेत प्रचंड गारवा होता. स्लिपिंग बॅगमधून या थंडीत बाहेर जाणे अगदी नकोसे होई.

ज्वाराहून निघालो, थोड्याच वेळात समोरच्या डोंगरात बर्फामध्ये एक 'इंद्रप्रस्थ' नावाचे शिखर दिसले. हे शिखर मात्र अजून कोणी सर केले नाही. ज्वारापासून 'शियागारू'पर्यंत सर्व रस्ता वाळू, दगडांनी भरलेला, पण चढ फार नव्हता. त्यामुळे फारसा त्रास न होता शियागारूला पोहोचलो. आणि आमचा जीवघेणा प्रवास सुरू झाला.

पुढे हमता पास सुमारे १४,१०० फूटावर आहे. वाटेत गेस्लीयर्स. बर्फावरून जाताना पाय सरकत होते. बर्फावरून चालण्याची सवय नसल्यामुळे थोडे पुढे गेल्यावर परत थोडे मागे येत होतो. आमच्या बूटांचा काहीच उपयोग होत नव्हता. पावलागणिक आपण खाली पडू अशी भीती मनात होती. प्रत्येक पाऊल टाकल्यावर श्वास फुटत होता. सुमारे तासाभरा-नंतर गोकुळने यातून मार्ग काढला. त्याने एका घोड्यावरचे सर्व सामान उतरवले. त्या घोड्यावर नंदिनीला चक्क उचलून बसवले. मला त्याच घोड्याची शेपटी धरून चालायला सांगितले. थोडे श्रम कमी झाले, पण त्या थंडीतसुद्धा सर्व कपडे पूर्ण भिजले होते. शेवटी एकदा साडेतीनच्या सुमारास हमता पासला पोहोचलो. हमता पासला पोहोचल्यावर गोकुळने सांगितले, ''अंकल, अब सिर्फ डाऊन है''.

आम्हाला आता चढलेला डोंगर दुसऱ्या बाजूने उतरायचा होता. आपण काहीतरी मिळवल्याचा आनंद फार काळ टिकला नाही.

कारण (अल्टिट्यूड) श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला व लगेचच खाली उतरायचे निश्चित झाले. हा प्रकार अजिबात सोपा नव्हता. खाली येण्यास जवळजवळ संध्याकाळ झाली. ढोपरं व मांड्या फुटल्या होत्या, कारण चालत उतरणं अशक्य होतं. खाली आल्यावर पूरणमलने दिलेले जेवण गुपचूप जेवलो आणि पाचच मिनिटात आम्ही दोघं पुढे सात तास गाढ झोपलो.

सकाळी चहा व नाश्ता करून जरा उशिराच निघालो. पहिला नाला त्यातील अशक्य गार पाण्यामुळे घोड्यावर बसून पार केला. आपण दहा फूट का होईना घोड्यावर बसलो म्हणून लाज वाटली. पण इलाज नव्हता. सगळीकडे स्वच्छ सूर्यप्रकाश होता. एक पर्यंत 'छतडू' च्या अलीकडे एक धाबा लागला. सर्व तीन तास आम्ही डोंगर चढतच होतो. पण मजा येत होती. आदल्या रात्री मस्त झोप झाली होती, चढही प्रचंड नव्हता. फक्त हा प्रदेश लेहच्या टापूत येत असल्यामुळे इथे झाडी अजिबात नव्हती. धाब्यावर कढी व भात खाऊन संध्याकाळ 'छतडू'ला पोहोचलो. थंडी माफक होती. जेवणानंतर आम्ही तिघांनी भरपूर गप्पा मारल्या. हमता पास पार केल्याबद्दल पूरणमलनी आम्हाला पाकातल्या पुऱ्या खिलवल्या. नंदिनी आंटीचं भरपूर कौतुक केलं.

गोकुळनं पुढील दोन दिवसाचा प्रवास साध्या रस्त्यावरून आहे असं सांगितल्यावर आम्ही दोघेही खुश झालो. म्हणजे उद्यापासून लडाखला जाणाऱ्या जीप, लोकल जीप, जीपनी ट्रेक करणारे असं सर्व चालू होणार होतं म्हणजे माणसे दिसणार होती.

'छतडू' ते छोटा दारा हा प्रवास सोळा किलोमीटरचा आहे. वाटेत औषधालाही झाड नाही संपूर्ण वैराण पर्वत. सर्व रस्ता सपाट असल्यामुळे नंदिनीच्या संमतीने मी एकटा पुढे निघालो. साधारण चार तासात छोटा दाराला पोहोचलो. आज रात्रीचा मुक्काम झाला, की उद्या फक्त वीस कि.मी.चा प्रवास (पहिले १६ कि.मी. बातलपर्यंत व पुढे ४ कि.मी. लेकचा रस्ता असे धरून) करून आम्ही चंद्रतालला पोहोचणार होतो. मस्त मजेत होतो. तासभराच्या अंतरात दोन सिगरेटी फस्त केल्या, पण आमच्या टिममधल्या कोणाचाच पत्ता नव्हता. मनात पाल चुकचुकली. नंदिनीला लेहच्या ट्रिपप्रमाणे उंचीचा त्रास झाला का? अखेर दीड-पावणेदोन तासांनी सर्व आले. नंदिनीला प्रचंड थकवा आला होता. डोकेपण जड झाले होते. उलटी होईल असं वाटत होतं. हा सर्व उंचीचा परिणाम होता. एक तंबू लगेचच लावला व त्यात नंदिनी पडून राहिली.

आज अख्खी रात्र इथे काढून उद्या परत वीस किलोमीटर चालत जाणे. हे फार शहाण-पणाचं नव्हतं. पूरणमलने रोट्या व भाजी केली. ती जेमतेम खाल्ली. नंदिनीच्या पोटात काहीही नव्हतं. मी व गोकुळने परत जाण्याचा निर्णय घेतला. सुमारे दीडतासानंतर एक जीप जपानी प्रवाशांना घेऊन जाताना दिसली. त्यांना सर्व कल्पना दिली. त्यांची कॅम्प साईट जवळच होती. त्यांना सोडून जीप परत आली. आम्ही जीपमध्ये बसलो. उंची जसजशी कमी होत गेली, तसतसं नंदिनीला बरं वाटू लागलं. रात्री अकराच्या सुमारास मनालीत परत आलो.

- आता परत चंद्रताल जमेल तेव्हा... पण पायीच.

**- श्री. आनंद मराठे, (पृ. २७७)**
'सुयश', विष्णूनगर, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२५५२४

## I want this back. It DOES work.

His name was Fleming, and he was a poor Scottish farmer. One day, while trying to make a living for his family, he heard a cry for help coming from a nearby bog. He dropped his tools
and ran to the bog.
There, mired to his waist in black muck, was a terrified boy, screaming and struggling to free himself. Farmer Fleming saved the lad from what could have been a slow and terrifying death.
The next day, a fancy carriage pulled up to the Scotsman's sparse surroundings. An elegantly dressed nobleman stepped out and introduced himself as the father of the boy Farmer Fleming had saved.
'I want to repay you,' said the nobleman. 'You saved my son's life.'
'No, I can't accept payment for what I did,' the Scottish farmer replied waving off the offer. At that moment, the farmer's own son came to the door of the family hovel.
'Is that your son?' the nobleman asked.
'Yes,' the farmer replied proudly.
'I'll make you a deal. Let me provide him with the level of education my own son will enjoy If the lad is anything like his father, he'll no doubt grow to be a man we both will be proud of.' And that he did.
Farmer Fleming's son attended the very best schools and in time, graduated from St. Mary's Hospital Medical School in London, and went on to become known throughout the world as the noted Sir Alexander Fleming, the discoverer of Penicillin.
Years afterward, the same nobleman's son who was saved from the bog was stricken with pneumonia.
What saved his life this time? Penicillin.
The name of the nobleman? Lord Randolph Churchill ..
His son's name?
Sir Winston Churchill.
Someone once said: What goes around comes around.

**प्रेषक : रमाकांत विद्वांस (पृ.६२३)**

# स्त्रिया : कालच्या की आजच्या

**सौ. शामला पुरंदरे (जाईल)**

माझी बालमैत्रीण ललिता बाठिआ हिची 'दोघी' ही कविता वाचली. दोन डहाळ्या, एक जुईची व एक सईची पहिलीवर पाखरे बसतात, वारा तिचा सुगंध आसमंतात पसरवितो. नाजुकशा फुलांचा सडा खाली पडून जमीन सुशोभित होते. एखादा दमलेला, थकलेला वाटसरू ओंजळभर फुले वेचतो व त्याचा शिणवटा नाहीसा होतो हे सर्व अनुभवून जुई अगदी तृप्त होते. सईच्या डहाळीला मात्र कधी कधी असह्य वेदना होणाऱ्या चोची खुपसल्या जातात, मग ती गुदमरते. तिचा जीव कासावीस होतो, डोळे अश्रूंनी डबडबतात अशा या 'सई'च्या म्हणजेच स्त्रीच्या आयुष्याला अर्थ आहे का? याला उत्तर आहे ते म्हणजे प्रत्येक स्त्रीचे जीवन अर्थपूर्णच आहे. मग ती कालची असो वा आजची!

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये चूल व मूल हेच तिचं क्षेत्र असलं तरी घरी आलेल्या पै-पाहुण्यांचं यथोचित आदरातिथ्य होत असे. जात्यावर दळणं, वर्षभराचे मसाले कुटणं, पापड-लोणची बनविणं अशा कामांमुळे तिला भरपूर व्यायाम होत असे. त्यातूनच एखादी हौशी स्त्री लोकरीच्या वस्तू विणत असे किंवा कपडे शिवत असे. सणासुदीला तऱ्हतऱ्हेचे पदार्थ बनवून तिचे पाककौशल्य सिद्ध होत असे. पणजीकडे औषधांचा बटवा असायचा, तर आजीजवळ गोष्टींचा खजिना. आत्या शुभंकरोति म्हणून घ्यायची व मामी रांगोळी शिकवायची. मावशी पाढे घोकून घेताना कंटाळत नसे. अशाप्रकारे सर्वांगीण विकास व्हायला काहीच अडथळे नव्हते. नोकरी-चाकरी नसल्याने टेन्शन नव्हते, त्यामुळे सर्वसाधारणपणे शांतता असायची. या सर्व चाकोरीबद्ध चौकटीतून बाहेर पडलेल्या स्त्रिया अन्य क्षेत्रांमध्ये चमकल्या. जसे पौराणिक काळी कुंती, द्रौपदी नंतर गार्गी,पाणिनी व तद्नंतर राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर आणि अलीकडच्या काळात इंदिरा गांधी, शीला दीक्षित! गोपाळराव जोंशीमुळे आनंदीबाई फिलाडेल्फियाला जाऊन डॉक्टर होऊन भारतात परतली, पण त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीमुळे तिला औषधावाचून मरण पत्करावे लागले. मग मात्र स्त्री अबला न राहता मनाने खंबीर झाली. कुटुंबनियोजन हा शब्द मनात उच्चारणं हेदेखील पाप समजलं जाई अशा वेळी शकुंतला परांजपे सारखी विदुषी हिंदुस्थानभर त्याच प्रचार करीत राहिली. कौटुंबिक स्थितीचा लाभ उठवून स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्टपणे कामगिरी बजावू लागल्या. उदाहरणार्थ - विजयालक्ष्मी पंडित, राजदूत, पहिल्या राज्यपाल, सरोजिनी नायडू. सुचेता कृपलानी : मुख्यमंत्री व अरुणा असफअली या महापौर. माउंट अबू चढणारी बंछेद्री पाल आणि सुवर्णकन्या पी.टी.उषा कोणाच्या बरं लक्षात नाहीत? जमिनीवर प्रभुत्व गाजविणाऱ्या महिला आकाशाला पण आपल्या कक्षेत घेऊ लागल्या. वैमानिक प्रेमा माथूर व अवकाशकन्यका कल्पना चावला. जगभर अजरामर झाल्या कलाक्षेत्रामध्ये गंगूबाई हनगल, हिराबाई बडोदेकर, वैशाली सामंत. बहुरंगी व्यक्ती पुरस्कार विजेत्या विजया साठे यांनी रसिकांची हृदये जिंकली. दिल्ली येथील तिहार तुरुंगातल्या कैद्यांची सुधारणा व्हावी म्हणून अखंड झटणारी आय.पी.एस अधिकारी किरण बेदी वंदनीय आहे. दुर्गाबाई भागवत सर्वांच्याच लक्षात आहेत. १९३४ मध्ये बालूताई खरे यांनी 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी लिहिली ज्यात बेजबाबदार नवरा, पुर्नविवाह यांसारखे प्रश्‍न हाताळले. खानदेशमधील बहिणाबाई चौधरी यांनी संसाराचे सार ग्रामीण व सोप्या भाषेमध्ये मांडले. या सर्व गोष्टींवरून एक गोष्ट स्पष्ट होते, की जात व शिक्षण यांच्या मर्यादा स्त्रीच्या कर्तृत्वाच्या आड आल्या नाहीत. पुढे सर्वसामान्य स्त्री घराचे उंबरठे ओलांडून बाहेरील विश्वात आली, शिकू लागली. जग न्याहाळून स्वत:ची मते बनवून चाणाक्ष झाली. याचे श्रेय 'सावित्रीबाई फुले व बाया कर्वे या आदर्श शिक्षिकांकडे जाते. स्वत:च्या सहचाऱ्याच्या मदतीने त्यांनी समाजाने केलेल्या उपेक्षेस खंबीरपणे तोंड दिले व आधुनिक कर्तबगार महिलेस जन्म दिला. यामुळेच तेव्हाच्या पनवेलमधून शकुंतला अत्रे १९६२ या वर्षी जर्मनीस जाऊन कॉम्प्युटर विजर्ड म्हणून नावारूपाला आली. पुण्यातील पुरोहित महिला सातासमुद्रापलीकडे जाऊन धार्मिक विधी सहजगत्या करू लागल्या. मद्रासमध्ये महिला ट्रक चालवितात आणि भावनगर मध्ये हमाली करतात. तरुण मुली पेट्रोलपंपावर काम करून संसारास हातभार लावतात. कॉलसेंटरवर रात्रपाळी करताना अजिबात डगमगत नाहीत. विप्रोची अधिकारी जयश्री जोगळेकर विमानाने जगभर प्रवास करते. गीता पिंपरीकर डाबरची डिलर म्हणून कौशल्य पणास लावते. हे सर्व करीत असताना स्त्रीची नजर घारीप्रमाणे आहे. गगनात उंच भरारी मारली, तरी तिचे लक्ष आपल्या घरट्याकडेच असते. परवाच 'सिटाडेल'चा अंक चाळला त्यातील 'लाईक पॅरेंट लाईक चाईल्ड' हा लेख खूप आवडला. पॅरेंट्स हे रॉल मॉडेल असल्यामुळे आई मनिषा साठे हिच्या पावलावर पाऊल ठेवून शांभवी वझे प्रख्यात नर्तिका होऊ शकते. डॉ. अनिता अवचट यांचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याकरिता त्यांची कन्या मुक्ता पुणतांबेकर 'मुक्तांगण' साठी सर्वस्व झोकून देते. डॉ. जब्बार पटेल यांची जोनेकी पटेल पुण्यातील एफटीआयआय या संस्थेचा एडिटींगचा कोर्स करतेय. प्रसिद्ध पत्रकार बरखा दत्त पाकितस्तानची सरहद्द ओलांडून जाते. तर पर्यटिका मिस दलाल फाल्गुनी नदीच्या पलीकडे बोधगयेचा प्रवास करते. कालच्या कविता गावस्करप्रमाणे आजची मंदिरा बेदी मर्दानी क्रिकेट सुलभपणे खेळते. रुपेरी मोठा व छोटा पडदा गाजविणाऱ्या स्त्री कलाकारांची याद नेहमीच येते.

आजची स्त्री रोजचे व्यवहार कुशलतेने पार पाडतेच शिवाय स्वत:च्या कलागुणांना भरपूर विकसित करते. वानगीदाखल सांगायचे तर डॉ. विजया वाड लेखनाइतकंच नातवंडांना पण प्रोत्साहित करतात. माझी मैत्रीण विजया कर्पूर व तिच्या सख्या 'सावरकर नाट्य' जबरदस्तपणे पेश करतात. या ठिकाणी लेखिका, दिग्दर्शिका, कलाकार सबकुछ सिर्फ महिलाच. अर्थात घरच्यांचं

सहकार्य असल्यामुळे आजची स्त्री हे सर्व करू शकते. पूर्वी म्हणत असत की Behind every successful man, there is a woman आता Behind every successful woman, there is a man .

सहचारी मदत करणारा नसेल तर महिला डगमगून न जाता मार्ग शोधत राहते. म्हणून तर ७५ वर्षांपूर्वी त्रिपाठी अम्माने स्मशान पौराहित्य करण्यास मागेपुढे बघितले नाही. माझी वहिनी नीलिमा प्रतिकूल काळामध्ये पण स्वत:ची जीवनमूल्ये घट्ट पकडून आहे. पतीच्या निधनानंतर मुंबईतील अनघा दाणी, मीना जोशी व चंद्रकला कामत या सर्व जबाबदाऱ्या न कुरकुरत्या पार पाडतात. निग्रही मन व कणखर शरीर यामुळे ध्येयपूर्तीसाठी अखंड करावयास लागणारे कष्ट कस्पटासमान मानले जातात. सुमारे २५ वर्षांपूर्वी दिल्लीहून पुण्यास खुशवंसिंग आले होते. सायकल चालविणाऱ्या असंख्य बायका बघून त्यांना कौतुक वाटले. आता जर त्यांनी स्कूटर चालविणाऱ्या अगणित धीरबाला पाहिल्या तर त्यांना अचंबाच वाटेल. डोक्यावर हेल्मेट, अंगभर सनकोट, कांगारूप्रमाणे पोटाशी लेकरू व पाठीशी कामाचे ओझे. मुंबईमध्ये पहाटे उठून, घरातील सर्व आटोपून लोकलसाठी रोज धावणाऱ्या नोकरदार महिला डब्यामध्ये सणवार उत्साहाने साजरे करतात. आधुनिक स्त्रीस नव-नवीन क्षितिजे खुणावतात म्हणून 'पार्ले सॉफ्ट ड्रिंक' मध्ये फूड टेक्नोलॉजिस्ट या हुद्द्यावर काम करणारी सरिता पेडणेकर 'शाकूज' हे लेदरच्या वस्तूंच दुकान उघडते. दूरदर्शनवरील वृत्तनिवेदिका शिबानी जोशी हिने 'सई' या महिला संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रीय संस्कृती व परंपरा जिवंत ठेवण्यासाठी ही संस्था भोंडल्याचे कार्यक्रम सादर करते. त्यात थोडे बदल करून 'एक लिंबू झेलू बाई' गाताना लिंबाचे औषधी गुणधर्म विशद केले जातात. 'अश्विन आला बाई' द्वारे पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले जाते. म्हणजेच बदलत्या काळाच्या गरजा समाजाच्या लक्षात आणण्याचे कार्य या सर्वजणी अत्यंत डोळसपणे करत आहेत. विजया पाटील सेकंदाचे महत्त्व पटवून देतात व अर्चना भडकमकर, मीना इनामदार व मंगला देसाई या स्फूर्तीदेवता. अंधांच्या जीवनात प्रकार निर्मितीचे काम करतात. हे सर्व करीत असताना आजची महिला स्वत:च्या आप्तांना अजिबात विसरत नाही. यास्तव प्रसिद्ध गायिका शोभा जोशी मातृस्मृतीप्रीत्यर्थ उगवत्या कलाकारांच्या आईवडिलांचा सत्कार घडवून आणण्याची एक आगळीवेगळी प्रथा पाडते व कमिन्सच्या ऑडिट फंक्शनची अधिकारी सुवर्णा छाजेड आपल्या यशाचे श्रेय विनम्रतेने बांद्रा येथील शाळेच्या गुरुजनांना बहाल करते. हृदयाचा मार्ग जठराकडून जातो हे सत्य लक्षात ठेवून पूर्वी कमलाबाई ओगले यांनी 'रुचिरा' लिहिलं, तर बदलत्या आवडीनुसार करीना आनंद ने 'चटपटीत चाट' चोखंदळ खवैय्यांसाठी बनविले. थोडक्यात काय तर स्त्री कालची असो वा आजची, अशिक्षित असो किंवा सुशिक्षित, ती हुशार, कर्तबगार, व्यवहारी आणि कर्तव्यनिष्ठ आहे यात शंकाच नाही.

कधी तरी! मात्र या तिच्या प्रतिमेला गालबोट लागते. मग आपल्याला प्रतिमाकुमारी, सानामा व मोनिका बेदी सारखर प्रकरणे लज्जित करतात. बॉयफ्रेंड बरोबर स्मोकिंग करणाऱ्या व बीअरचे घुटके घेणाऱ्या तरुणी हल्ली सर्वत्र आढळतात. अशांसाठीच नव्हे तर समस्त स्त्रीवर्गासाठी एक कळकळीचे आव्हान करावेसे वाटते, की चुका न होतील इकडे लक्ष द्या, चुका झाल्याच तर त्यांची पुनरावृत्ती करू नका. कारण आपल्या बाबतीत असं म्हटलेलं आहे 'जिच्या हाती असे पाळण्याची दोरी, ती सर्व जग उद्धारी' म्हणूनच थोर विचारवंत म्हणतात, 'एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती शिकते, पण एक स्त्री शिकली तर शंभर व्यक्ती सुशिक्षित होतात.'

थोडक्यात सांगायचं म्हणजे नोबेल पारितोषिक विजेती मदर तेरेसा काय किंवा या वर्षीची द बेस्ट बिझनेसवुमन किरण मुजुमदार-शॉ असो. हर्बल ब्युटीक्वीन शेहनाज हुसेन असो किंवा पॉप सिंगर उषा उत्थप असो. योगासननिपुण गीता अय्यंगार असू दे अथवा पर्यावरणरक्षणकर्ती मेधा पाटकर ह्या प्रत्येकीजवळ महान शक्ती आहे. या शक्तीचा उपयोग तिने मानव कल्याणासाठी केला तर अवघे विश्व सुखी होईल.

It is rightly said that life is a stage and your performance defines your excellence तेव्हा असाधारण व साधारण स्त्रियांप्रमाणे आपण पण आपल्या कामात यशस्वी होण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करू या.

नवरात्रीचा उत्सव धुमधडाक्यात साजरा करतात. देवी चैतन्यमय आहे. तिच्याप्रमाणेच आपण पण वाईट विचार नष्ट करू या. निसर्गाचे रक्षण करू या. समाजात फोफावणाऱ्या भ्रष्टाचारास हटवू या म्हणजे जरी बकुळीचं फूल सुकलं तरी तिचा सुवास नंतर ही दरवळत राहील यातच कालच्या, आजच्या व उद्याच्या स्त्रीची सार्थकता आहे.

**- श्यामला अरविंद पुरंदरे**
२७ ब, वृंदावन सोसाटी, फेज २, पंचवटी, पाषाण
पुणे ४११ ००८
दूरध्वनी : २५८९८५३४ / ९४०३६२५७२४

सौ. श्वेता शेखर एरंडे (वडील धनंजय वासुदेव मराठे) आज, श्री. नचिकेत श्रीकृष्ण मराठे, पुणे, श्री. विश्वास यशवंत मराठे, निगडी, पुणे, श्री. गजानन चिंतामण मराठे, राजेंद्रनगर, पुणे, श्री. वासुदेव दत्तात्रय मराठे, कात्रज, पुणे, श्री. धनंजय वासुदेव मराठे, कोथरूड, पुणे, सौ. उज्ज्वला मुकुंद बापट (वडील श्री. वासुदेव दत्तात्रय मराठे), कल्याण, श्री. माधव वामन मराठे, पुणे, सौ. श्यामला पुरंदरे (जाईल), पुणे, श्री. अमित माधव मराठे, पुणे, श्री. अभिजित निरंजनकुमार मराठे (परदेशात), कॅलिफोर्निया, श्रीमती शोभना रामचंद्र मराठे, ठाणे, श्री. अ. स. मराठे, मुलुंड, श्री. विठ्ठल यशवंत मराठे, बेळगाव, श्री. सुधाकर विष्णू मराठे, नागाव, राहुल रविंद्र विद्वांस, कल्याण, श्री. अ. द. मराठे, डोंबिवली, श्री. पद्मनाभ नागभूषण मराठे, दुर्ग, श्री. अजय अविनाश मराठे, बार्शी, श्री. अनिरुद्ध उर्फ अमोल श्रीनिवास मराठे आणि श्री. माधव विष्णू मराठे (दोघेही परदेशातील), मोरेश्वर लक्ष्मण मराठे, सांगली

या देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार आणि धन्यवाद!

**विशेष सूचना**

हितगुज राखीव फंड निधी-देणगी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी.

# अविस्मरणीय घटना : माझा एक अनुभव

**डॉ. सौ. सीमा मराठे, पुणे**

जीवनाच्या कोणत्या टप्प्यात कोणते आव्हान स्वीकारावे लोगल याची काहीच निश्चितता नसते. आकस्मिक येणारे प्रसंग पूर्णपणे दैवाधीन असतात असं माझं ठाम मत आहे.

प्रसंग बऱ्याच वर्षांपूर्वीचा आहे. माझ्या दिल्लीस्थित मामाची लंडन येथील युनिव्हर्सिटीत प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली होती आणि तो रिसर्चही करणार होता. त्यास प्रेमादराने निरोप देण्याकरिता आम्ही जवळचे दहा-बारा आप्त मुंबई एअरपोर्टवर गेलो. त्या वेळी मी मेडिकलच्या तिसऱ्या वर्षात शिकत होते.

फ्लाईट संध्याकाळी सहाची होती. त्यापूर्वी दोन तास गप्पा झाल्या. अनेक सूचना, उपदेश व शुभेच्छांचा वर्षाव त्याच्यावर पडला. अखेर मामाची निघण्याची वेळ आली. मनातील वियोगाची घालमेल, तसेच करिअरमधील उत्तम संधीचा आनंद अशा संमिश्र भावना सर्वांच्या डोळ्यांतील अश्रूद्वारे व्यक्त झाल्या.

मी, नाना व आई पुण्यास परतण्याकरिता दादर स्टेशनवर आलो. दोन नंबरच्या प्लॅटफॉर्मवर जाण्याकरिता जिन्यावरून उतरू लागला. उतरत असतानाच वेगाने येणारा विषारी वायू आमच्या नाका-तोंडात घुसला. घसा, डोळ्यांना झोंबणारा वायू चटकन फुफ्फुसात शिरला. आम्ही गुदमरू लागलो. श्वास घेणं अवघड जाऊ लागलं. नाकावर हात दाबत कसेबसे प्लॅटफॉर्मवर आलो. लगेचच कळले की क्लोरीन गॅसचा जिन्याखाली ठेवलेल्या सिलेंडर्सपैकी काही फुटले होते व क्लोरीन गॅसची गळती झपाट्याने होऊन तो हवेत पसरू लागला होता. मी व आई कश्याबश्या श्वास घेण्याच्या स्थितीत आलो. स्वच्छ हवेचा झोत आल्यामुळे दोघींची अवस्था नॉर्मलवर आली.

मात्र, माझ्या वडिलांना.. नानांना... श्वास घेता येईना. त्यांना मुळातच ब्रॉन्कीयल अस्थमा होता. त्यांना गंभीर स्वरूपाचा दम्याचा ॲटॅक आला. परिस्थिती ओळखून मी झटकन त्यांच्या पिशवीतील औषधाची डबी काढली व दम्याकरिता घेत असलेली एक गोळी त्यांना दिली. पण त्यांची अवस्था सुधारली नाही, त्यांच्याकडे पाहून मी हबकलेच. पण पायात उसना त्राण आणून प्लॅटफॉर्मवरच्या एका टोकाला असणाऱ्या ऑफिसमध्ये पळत गेले अन् ॲम्ब्युलन्सला फोन केला. परंतु ती ॲव्हेलेबल नाही असं कळलं. माझ्या जीवाची अगतिकता वाढली. एक एक सेकंद महत्त्वाचा होता.

मी पुन्हा नानांपाशी आले. त्यांचा जीव अधिकच घाबरा होऊ लागला होता. त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यायचा निर्णय मी घेतला. मी मेडिकलला असल्या कारणाने त्यांना ऑक्सिजन द्यायची गरज होती हे मी जाणलं. जवळील एका व्यक्तीच्या मदती त्यांना बाहेरील टॅक्सी स्टँडपाशी नेलं. आईला सामानापाशी बसण्यास सांगितले. माझे मोठे काका थोड्याच वेळात तिथे येणार होते.

मुंबई शहराची काहीही माहिती नव्हती. एवढ्या मोठ्या शहरातील कोणत्या हॉस्पिटलमध्ये जायचे? मी अगतिकपणे टॅक्सीवाल्याला विचारले व नानांच्या प्रकृतीबद्दल कल्पना दिली.

''ताई, के.ई.एम हॉस्पिटल त्यातल्या त्यात जवळ आहे. मी तिथे नेतो. बसा मागे.'' असं म्हणून त्याने मागील दरवाजा उघडला. नानांना आत बसविण्यास मदत केली. प्लॅटफॉर्मवरील मदतीला आलेल्या माणसास के.ई.एम मध्ये जात आहोत असा निरोप आईला देण्यास सांगितला.

टॅक्सी वेगाने धावू लागली, परंतु गर्दीतून वाट काढणंही सोपं नव्हतं. मुळातच गोरा वर्ण असलेल्या नानांचा चेहरा निळसर दिसू लागला. मानेवरील रक्तवाहिन्या मोठ्या, निळ्या व स्पष्ट अन् ताठ दिसू लागल्या. मी अधूनमधून त्यांची छाती दाबीत होते. त्यांना श्वास घेण्याचा प्रयत्न करा असं आवर्जून सांगत होते. परंतु त्यांची प्रकृती सुधारत नव्हती. नाना जीवनमृत्यूच्या सीमेवर उभे होते. आणि त्यांच्या अशा अवस्थेत त्यांची एकुलती एक कन्या ह्या अनोख्या शहरात एका टॅक्सीत त्यांच्या शेजारी बसली होती. माझा जीव तळमळत होता तो अत्यावश्यक वैद्यकीय उपचार त्यांना मिळत नव्हते म्हणून! काही सुचेना म्हणून श्रीरामाचा जप मनात करू लागले. अखेर के.ई.एम. हॉस्पिटल आले. टॅक्सीवाल्याचे बिल दिले आणि बाहेर आले.

स्ट्रेचरवरूनच इमरजन्सी वॉर्डमध्ये तिथल्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ नेले. तिथल्या डॉक्टरांना मी भराभर घडलेला प्रकार सांगितला आणि त्यांना अस्थमा आहे असंही सांगितले. त्याच वेळी नानांची शुद्ध हरपली. ते निपचित पडले. डॉक्टरांनी त्यांना त्वरित ऑक्सिजन लावला. तातडीने लागणारी इंजेक्शन्स देण्यात मीही त्यांना मदत केली. इंट्राव्हेनस इंजेक्शन देऊन सलाईन लावले. अंदाजे सात ते दहा मिनिटात श्वसन पूर्ववत झाले. चेहऱ्याचा रंग हळूहळू गुलाबी झाला. दरदरून आलेला घाम मी माझ्याजवळ असलेल्या पिशवीतील नॅपकीनने पुसू लागले व त्यांना हाका मारू लागले,

''नाना ऽऽ नाना कसं वाटतंय तुम्हाला?''

नानांनी डोळे उघडले. माझ्याकडे पाहिलं अन् मला ओळखलं. परंतु बोलता येईना. त्यांच्यावर योग्य वेळी वैद्यकीय उपचार झाले होते.

''असू दे. बोलू नका. विश्रांती घ्या. तुम्ही आता संकटातून वाचला आहात. लवकरच चांगले बरे व्हाल.'' मी त्यांना धीर देत म्हणाला. त्यांच्या डोक्यावरून हात फिरवला. आई जसा मुलाच्या डोक्यावरून फिरवते ना तस्सा! नानांवर माझा भारी जीव! एवढ्या मोठ्या जगात मला त्यांचाच आधार वाटायचा. आणि...आज त्यांना नवजीवन मिळालं होतं. ओढणीने डोळ्यांतून वाहणारे अश्रू पुसत त्यांच्या कॉटजवळील स्टुलावर बसून राहिले.

त्या क्लोरीनच्या वायू गळतीमुळे बऱ्याच जणांना त्रास झाला होता. अर्थात ही ॲक्सिडेंट केस झाली. रेल्वे पोलीस रात्री आठच्या सुमारास नानांजवळ आले व चौकशी करू लागले. मी त्यांना घडलेली हकिकत सांगितली.

''तुमची काही तक्रार आहे का?'' त्यांनी विचारले.

''माझे नाना मरणाच्या कचाट्यातून वाचले हीच माझ्याकरिता सर्वांत मोठी बाब आहे. माझी काही तक्रार नाही.''

*(पृष्ठ १४ वर)*

## मराठे प्रतिष्ठान विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

मराठे प्रतिष्ठानच्या घटनेत कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या दुरुस्त्यांना मंजुरी देण्यासाठी मराठे प्रतिष्ठानची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १० एप्रिल २०१० रोजी सायंकाळी ४ वाजता मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या प्रस्ताविक सुधारणा खाली दिल्या आहेत. सर्व सभासदांनी सभेला अगत्यपूर्वक उपस्थि राहावे ही विनंती

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून

मोहन सदाशिव मराठे, कार्यवाह

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१०

टीप : गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती नंतर सायंकाळी ४.३० वाजता त्याच ठिकाणी होईल आणि या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.


## मराठे प्रतिष्ठानच्या घटना दुरुस्तीविषयक प्रस्ताव

| कलम क्र. | सध्याचे कलम | प्रस्तावित सुधारणा | सुधारित कलम |
|---|---|---|---|
| ५. उद्देश : (अ) | मराठे परिवारातील व्यक्तींना आर्थिक सहाय्य तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्या अनुषंगाने योग्य ते उपक्रम सुरू करणे. | 'व्यक्तींना' व 'आर्थिक सहाय्य' या शब्दांमध्ये 'व त्यांच्या अभावी समाजातील इतर गुणवान पात्र व गरजू व्यक्तींना' हे शब्द घालणे | मराठे परिवारातील व्यक्तींना व त्यांच्या अभावी समाजातील इतर गुणवान पात्र व गरजू व्यक्तींना आर्थिक सहाय्य, तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्या अनुषंगाने योग्य ते उपक्रम सुरू करणे. |
| (ओ) | वरील उद्देशांप्रमाणे संस्थेकडून 'मराठे' परिवारासाठी करण्यात येणाऱ्या सोयींचा फायदा प्रतिष्ठानने घातलेल्या मर्यादेत व अटींवर परिवाराबाहेरील व्यक्तींस देणे | १. 'प्रतिष्ठानचे' ऐवजी 'प्रतिष्ठानने' हा शब्द घालणे. २. 'वा अटींवर' व 'परिवाराबाहेरील' या शब्दांमध्ये अनुक्रमे 'कार्यक्षेत्रातील' हा शब्द घालणे. ३. 'परिवाराबाहेरील व्यक्तींस' या ऐवजी 'परिवाराबाहेरील समाजातील इतर गुणवान व पात्र व्यक्तींना' हे शब्द घालणे. | वरील उद्देशांप्रमाणे संस्थेकडून 'मराठे' परिवारासाठी करण्यात येणाऱ्या सोयींचा फायदा घातलेल्या मर्यादेत व अटींवर कार्यक्षेत्रातली परिवाराबाहेरील समाजातील इतर गुणवान पात्र व्यक्तींना देणे. |
| ६. सभासदत्व-नोंदणी, वर्गवारी वगैर (आ) - पोटकलम (५) | ५. प्रतिष्ठानच्या आर्थिक वर्षामध्ये रु. १२ वार्षिक वर्गणी देणारे. | हे कलम पूर्ण रद्द करून त्या ठिकाणी ५ क्रमांकावर सध्या असलेले क्र. ६ चे कलम सुधारणा करून घालणे. | |
| ६. सभासदत्व-नोंदणी वर्गवारी वगैरे (आ) पोटकलम (४) पोटकलम (६) | ४. आजीव : रु.१०० किंवा अधिक एकरकमी किंवा चार समान व लागोपाठच्या मासिक हप्त्याने देणारे ६. सन्माननीय : कार्यकारी मंडळाच्या ठरावाने स्वीकृत झालेल्या परिवारातील आदरणीय व्यक्ती | 'एकरकमी' या पुढील किंवा चार समान व लागोपाठच्या मासिक हप्त्याने देणारे 'परिवारातील' व 'आदरणीय' व्यक्ती' यामध्ये 'व समाजातील' हे शब्द घालणे. | ४. आजीव : रु. १०० किंवा अधिक एकरकमी देणारे<br>५. सन्माननीय : कार्यकारी मंडळाच्या ठरावाने स्वीकृत झालेल्या परिवारातील व समाजातील आदरणीय व्यक्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. कार्यकारी मंडळ | मराठे प्रतिष्ठानचे कामकाज सांभाळण्यासाठी प्रतिष्ठानची वार्षिक सभा अकरा पर्यंत सदस्यांची निवड करील. निवडलेले असे सदस्य व प्रत्येक अधिकृत शाखेचा प्रत्येकी एक प्रतिनिधी यांचे कार्यकारी मंडळ त्याच्या सदस्यांमधून कार्याध्यक्ष, कार्योपाध्यक्ष, कार्यावाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड करील. कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षांची राहील. | १. 'वार्षिकसभा' व 'संस्थांची' या शब्दांमध्ये 'कमीत कमी पाच व जास्तीत जास्त पंधरापर्यंत (त्यांपैकी किमान एक महिला सदस्य)' हे शब्द घालणे.<br>२.'सदस्यांची' व 'निवड' या शब्दांमध्ये 'विहित नमुन्यातील पात्र व प्राप्त अर्जातून' हे शब्द घालणे<br>३. 'वर्षाची' व 'राहील' या शब्दांमध्ये 'अथवा पुढील निवडणूक होईपर्यंत' हे शब्द घालणे.<br>४. 'राहील.' या नंतर 'धर्मादाय आयुक्तांकडे फेरफार अर्ज दाखल करण्यात येतील' हे वाक्य घालणे. | मराठे प्रतिष्ठानचे कामकाज सांभाळण्यासाठी प्रतिष्ठानची वार्षिक सभा कमीत कमी पाच व जास्तीत जास्त 'पंधरापर्यंत त्यापैकी किमान एक महिला सदस्य)' सदस्यांची विहित नमुन्यातील पात्र व प्राप्त अर्जातून निवड करील. निवडलेले असे सदस्य व प्रत्येक अधिकृत शाखेचा प्रत्येकी एक प्रतिनिधी यांचे कार्यकारी मंडळ त्याच्या सदस्यांमधून कार्याध्यक्ष, कार्योपाध्यक्ष कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांची निवड करील. कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षांची अथवा पुढील निवडणूक होईपर्यंत राहील. |
| ९. उपसमित्या | प्रतिष्ठानच्या कार्यात मदत व्हावी म्हणून विशिष्ट विषय व काळासाठी उपसमित्या नेमल्या जातील. त्यावरील सभासदांची निवड कार्यकारी मंडळ करील. प्रत्येक उपसमितीवर कार्यकारी मंडळाचा किमान एक सदस्य असेल. | 'मदत व्हावी म्हणून' व 'विशिष्ट विषय' या शब्दांत 'विश्वस्त मंडळास आवश्यक वाटल्यास' हे शब्द घालावेत. | प्रतिष्ठानच्या कार्यात मदत व्हावी म्हणून विश्वस्त मंडळास वा कार्यकारी मंडळास आवश्यक वाटल्यास विशिष्ट विषय व काळासाठी उपसमित्या नेमल्या जातील. त्यावरील सभासदांची निवड कार्यकारी मंडळ करील. प्रत्येक उपसमितीवर कार्यकारी मंडळाचा किमान एक सदस्य असेल. |
| १४. विसर्जन | अपरिहार्य कारणास्तव मराठे प्रतिष्ठान विसर्जित करण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास प्रतिष्ठानचे सर्व निधी व उत्पन्न स्थावर व इतर मालमत्ता अशीच समान उद्दिष्टे असलेल्या किंवा इतर चित्पावन ज्ञातीसंस्थेकडे किंवा संस्थांकडे सर्वसाधारण सभेच्या चार पंचमांश मताधिक्याने सुपूर्द करण्यात येईल. | 'प्रसंग उद्‌भवल्यास' व 'प्रतिष्ठानचे सर्व निधी' या शब्दांमध्ये 'धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीने' हे शब्द घालणे. | विसर्जन : अपरिहार्य कारणास्तव मराठे प्रतिष्ठान विसर्जित करण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीने प्रतिष्ठानचे सर्व निधी व उत्पन्न स्थावर व इतर मालमत्ता अशीच समान उद्दिष्टे असलेल्या किंवा इतर चित्पावन ज्ञातीसंस्थेकडे किंवा संस्थांकडे सर्वसाधारण सभेच्या चार पंचमांश मताधिक्याने सुपूर्द करण्यात येईल. |
| १५. साधारण | वार्षिक साधारण सभा वर्षअखेरीपासून सहा महिन्यांना आत घेतली जाईल व अशा सभेत मुख्यत: खालील कामकाज चालेल. | 'महिन्यांना आता' या शब्दांऐवजी 'महिन्यांच्या आत' हे शब्द घालणे. | वार्षिक साधारण सभा वर्षाअखेरी-पासून सहा महिन्यांच्या आत घेतली जाईल व अशा सभेत मुख्यत: खालील कामकाज चालेल. |
| १७. | कार्यकारी मंडळ : | 'कार्यकारी मंडळ' याच्यापुढे 'व मानधन आणि इतर खर्चाची तरतूद' हे शब्द घालणे. | कार्यकारी मंडळ व मानधन आणि इतर खर्चाची तरतूद |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. निधी | प्रतिष्ठानचा सर्व निधी कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या बँकेत अथवा इतर कायदेशीर मार्गाने योग्य त्या बचत योजनेमध्ये ठेवला जाईल. निधीबाबतचे सर्व व्यवहार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष संयुक्तपणे सांभाळतील. धनादेश यांच्यापैकी दोघांच्या सहीने दिले जातील. त्यातील एक सही कोषाध्यक्षांची असेल. | १. 'प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष' व 'कार्यवाह' या दोन शब्दाच्या मध्ये कार्योपाध्यक्ष हा शब्द घालणे.<br>२. 'यांच्यापैकी' ऐवजी 'या चौघांपैकी' हा शब्द घालणे. | प्रतिष्ठानचा सर्व निधी कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या बँकेत अथवा इतर कायदेशीर मार्गाने योग्य त्या बचत योजनेमध्ये ठेवला जाईल. निधीबाबतचे सर्व व्यवहार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष, कार्यवाह व कोषाध्यक्ष संयुक्तपणे सांभाळतील. धनादेश या चौघांपैकी दोघांच्या सहीने दिले जातील. त्यातील एक सही कोषाध्यक्षांची असेल. |
| २०. संकीर्ण पोटकलम इ) | किरकोळ खर्चासाठी रोख रक्कम म्हणून कार्यवाह रु. दोनशे पर्यंत स्वत:जवळ ठेवू शकतील व त्यातून केलेल्या खर्चास कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत संमती मिळवतील | 'किरकोळ खर्चासाठी रोख रक्कम म्हणून' व 'पर्यंत स्वत:जवळ ठेवू शकतील व त्यातून केलेल्या खर्चास कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत संमती मिळवतील' या दोन शब्द-समुच्चयामध्ये 'कोषाध्यक्ष रु. दोन हजार' हे शब्द घालणे. | किरकोळ खर्चासाठी रोख रक्कम म्हणून कोषाध्यक्ष रु. दोनहजार पर्यंत स्वत:जवळ ठेवू शकतील व त्यातून केलेल्या खर्चास कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेत संमती मिळवतील. |

*नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली या संस्थेचा भारतीय उद्योगरत्न नोव्हेंबर २००९चा पुरस्कार स्वीकारताना* →



## अरविंद वासुदेव मराठे

शिक्षण : बी.ई. इलेक्ट्रिकल, बी.ई. मेकॅनिकल
सर्वप्रथम धारवाड येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये लेक्चररची नोकरी केली.
त्यानंतर इंडियन पब्लिक सर्व्हिस कमिशन मधून मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसमध्ये क्लासवन ऑफिसर म्हणून निवड.
१९६७ मध्ये विवाह. १९६९ मध्ये चिंचवड येथे स्वत:चा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला रस्टन कंपनीमधील जॉब केले. त्यानंतर थर्मेक्स कंपनीमध्ये वॉटर ट्रिटमेंट प्लँटसाठी लागणारे सर्व जॉबवर्क केले. त्याच वेळी अपर्णा रबर लिमिंग कंपनीचे डायरेक्टर म्हणून काम पाहिले.
प्लेट ब्लेडिंग मशिन तयार केले. त्याचे व गिअर बॉक्सचे पेटंट मिळाले आहे. चित्रकलेची विशेष आवड. चित्रांचे बालगंधर्व रंगमंदिर येथे प्रदर्शन झाले आहे.
बासरी वादनाचेही कार्यक्रम केले आहे. कन्नड कवि द. रा. बेंद्रे यांच्या कवितांना चाली लावून त्याचा जाहीर कार्यक्रम पुणे येथील कन्नड संघात झाला.
नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली या संस्थेने भारतीय उद्योगरत्न हा पुरस्कार नोव्हेंबर २००९ मध्ये दिला.

त्याप्रमाणे जबानी लिहून पोलीस निघून गेले. त्या दिवशीची रात्र मी व आईने बाहेरील व्हरांड्यात असलेल्या बाकावर बसून काढली. मोठे काकाही सोबत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत नाना चांगले बरे झाले. डॉक्टर राऊंडला आले. त्यांनी तपासलं व घरी जाण्यास परवानगी दिली. माझ्याकडे पाहून म्हणाले, ''पोरी, तू वेळेवर आणलंस त्यांना इथे म्हणून वाचले. शिवाय त्यांची दम्याची गोळी स्टेशनवर दिल्यामुळे येथपर्यंत येईपर्यंत ते वाचले. तुला थँक्स द्यायला हवेत.''

''नाही, नाही. थँक्स कसले?'' मला पुढे बोलवेना, गळा दाटून आला. पुढे टॅक्सी करून आम्ही पुण्यास आलो.

वाचकहो! आज तो प्रसंग आठवला तरी जिवाची घालमेल होते. ईश्वर जसा संकटात टाकतो, तसाच त्यातून वाचवतोही ही श्रद्धा दृढ झाली.

- डॉ. सौ. सीमा शाम मराठे
'भुसारी कॉलनी', फ्लॅट नं. १२९,
स. नं. ७८, 'वेदभवन'जवळ, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५२८०३०९/२४४५६०६३

## सामान्य ज्ञान स्पर्धा निर्णय

### आयत्या वेळेची सामान्यज्ञान स्पर्धा २००९ चा निकाल

२५-१२-२००९ रोजी श्री. गजानन मराठे (पृ. १२९) यांनी त्यांचे वडील कै. चिंतामण द. मराठे यांच्या स्मरणार्थ आयत्या वेळची सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित केली होती.

| | |
|---|---|
| एकूण स्पर्धक : २५ | वयोगट : १३ ते ७६ |
| पुरुष स्पर्धक : १२ | स्त्री स्पर्धक : १३ |
| मुंबईतील स्पर्धक : ७ | पुण्यातील स्पर्धक : १८ |

स्पर्धेत एकाही स्पर्धकाचे बिनचूक उत्तरे आली नाहीत. कमीत कमी एका व ५० ते ६० प्रश्न सोडवले आहेत. याचाच विचार करण्यात आला. ५० पेक्षा कमी ३ स्पर्धाकांनी प्रश्न सोडवले आहेत. त्याचा विचार करण्यात आला नाही. एकूण २२ स्पर्धकांचे प्रश्न तपासण्यात आले व त्याची टक्केवारी काढण्यात आली व त्यातून निकाल जाहीर करण्यात येत आहे.

निकाल पुढील प्रमाणे घोषित करण्यात येत आहे. विजयी स्पर्धकांचे व भाग घेतलेल्या सर्व सभासदांचे अभिनंदन! विजयी स्पर्धकांची बक्षिसे त्यांना एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात चेकद्वारे पोस्टाने पाठवण्यात येतील.

**१. सौ. शुभदा शंकर मराठे,** ५०३, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०, वय ६३
एकूण गुणाची टक्केवारी ६२.२६%, ***प्रथम क्रमांक रु. ५००चे बक्षीस,***
एकूण प्रश्न सोडवले ५३, बरोबर उत्तरे ३३

**२. श्री. सीताराम गो. खांबेटे,** संपदा सोसायटी, अंधेरी मुंबइ, वय ७२,
एकूण गुणाची टक्केवारी ६०%, ***द्वितीय क्रमांक रु. ३००चे बक्षीस,***
एकूण प्रश्न सोडवले ६०, बरोबर उत्तरे ३६

**३. सौ. मोहिनी पुणतांबेकर,** ३८०, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०, वय ४७
एकूण गुणाची टक्केवारी ५६.६६%, ***तृतीय क्रमांक रु. २००चे बक्षीस***
एकूण प्रश्न सोडवले ६०, बरोबर उत्तरे ३४

वरील स्पर्धकांचे पुन: एकदा मराठे प्रतिष्ठानद्वारा अभिनंदन!

### सुगरणीचा सल्ला

* गाजर, मटारसारख्या भाज्या उकडल्यावर लगेच थंड पाण्याखाली धराव्यात. यामुळे त्यांचा रंग निघण्यापासून रोखता येतं.
* हिरव्या भाज्या उकडताना त्यात चिमूटभर खाण्याचा सोडा घालावा. यामुळे त्यांचा ताजा हिरवा रंग तसाच राहतो.
* पालेभाज्या, कोथिंबीर किंवा फ्लॉवर स्वच्छ धुण्यासाठीच तसंच त्यातील कीड वगैरे निघून जाण्यासाठी या भाज्या धुताना पाण्यात थोडंसं मीठ किंवा व्हिनेगर टाकावं.
* ग्रेव्ही असणाऱ्या भाजीत किंवा आमटीत मीठ जास्त पडलं, तर कच्च्या बटाट्याचे तुकडे त्यात टाकावेत. १५ मिनिटांनी ते काढा. भाजी-आमटीतील जास्तीचं मीठ हे बटाटे शोषून घेतात.

# वृद्धदिन

**सौ. रोहिणी विजय मराठे**

१ ऑक्टोबर रोजी वृद्धदिन साजरा झाला. त्या निमित्ताने मनोगत लिहावेसे वाटले. अलीकडच्या काळात वाढतं आर्युमान अनेक समस्यांना जन्म देत आहे. हाती खेळणारा पैसा, सोयीसुविधा, उपाचर पद्धती, मूत्रपिंडबदल, हृदय-कर्करोग शस्त्रक्रिया यावरील औषधोपचार हे सारे सहजशक्य होत गेले यामुळे माणसाचं आर्युमान वाढू लागले. अर्थात जास्त वय वाढेपर्यंत माणसाने जगू नये असे नाही, कारण मरण केव्हा, कुठे व कसे यावे हे मानवाच्या हातात नाही. आपले शारीरिक हाल व्हावेत व घरच्यांना त्याचा त्रास व्हावा असे कोणालाच वाटत नाही. सामाजिक, कौटुंबिक स्तरावरचे, घरातले, समाजातले वातावरण बदलत आहे. पिढी पिढीतलं अंतर हे यामागचे कारण आहेच. पण वेगानं बदलणारं जग, नव्या पिढीला समजून घेणारी मधली पिढी यात होणारी दमछाक आज अनेक प्रश्नांचं मोहोळ निर्माण करत आहे. हे वास्तव आहे.

समाजातल्या सर्वच स्तरावर बदल होत आहे. माझी आई संजीवन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होती. त्या वेळी शेजारच्या वॉर्डमध्ये एक आजी आजारी होत्या. त्यांचा मुलगा भेटायला येत असे. त्यांच्या बोलण्यावरून कळले, की हॉस्पिटलमधून घरी नेल्यावर आईकडे कोण लक्ष देणार? कारण ते दोघे पती-पत्नी नोकरी करत होते. मुलगी कॉलेज व क्लासकरिता दिवस-भर बाहेर असायची. बोलता बोलता त्यांनी मला विचारले, तुमच्या माहितीत अशा संस्था आहेत का? मी म्हटले, माझे पती विजय मराठे हे डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या संस्थेत स्वयंसेवक म्हणून काम करतात. त्यांच्याकडे वृद्धाश्रम आणि आजारी वृद्धांना सांभाळणाऱ्या संस्था यांचे फोन नंबर व पत्ते आहेत. घरी येऊन घेऊन जा. हे ऐकल्यावर त्यांना खूप मोठा प्रश्न सुटला असे वाटले. अशा समस्या आणखी खूप लोकांना असतील. मीही एक ज्येष्ठ नागरिक, मधल्या पिढीतील सदस्य आहे. म्हणजे 'तरुण वृद्धांचा गट'.

मलाही माझ्या आईबाबत अशीच समस्या आहे. आईच्या हातापायातील शक्ती कमी झाली आहे. तिला उभे राहता येत नाही. त्यामुळे जेवायला घालण्यापासून इतर सर्वच कामे मला घरचं सगळं सांभाळून करावी लागतात. जास्तीत जास्त मी तिची काळजी घेते, पण माझीही शारीरिक शक्ती कमी पडते. आईची सेवा करत असताना मीही आजारी पडू शकते. आणि कौटुंबिक समस्या व ताणतणाव वाढतील.

म्हणून घरातील ज्येष्ठ मंडळींनी एकत्र बसून विचारविनिमय केला आणि सर्वानुमते आईला आजारी वृद्धांकरिता काम करणाऱ्या संस्थेत ठेवायचे ठरले. केवळ नाईलाज म्हणून हा निर्णय घ्यावा लागला. अर्थात संस्थेत ठेवले म्हणजे आम्ही तिच्याकडे दुर्लक्ष करणार असे नव्हते. तिला वेळोवेळी भेटायला जाणे, औषधे नेऊन देणे, तिची प्रकृती दाखवण्यासाठी डॉक्टरांना घेऊन जाणे इ. कामे करायची होती. आईच्या आणि घरातील मंडळींच्या दृष्टीने सोयीस्कर अशी 'निवारा' या संस्थेत आईला दाखल केले आणि आम्ही निश्चिंत झालो. पण मनात विचार आला वाढतं आर्युमान हे शाप की वरदान!

- सौ. रोहिणी विजय मराठे
११/२, एरंडवन, कर्वेरोड,
शारदा सेंटर अपार्टमेंट, फ्लॅट नं. ४
पुणे ४११ ००४ दूरध्वनी : ०२०-२५४४१८०८

## सुगरणीचा सल्ला

* थंडीत डोसे-इडलीचे पीठ फुगण्यासाठी पिठात रात्री कांदा दोन फोडी करून टाका.
* गूळ नेहमी प्लॅस्टिकच्या पिशवीत पॅक करून मग डब्यात ठेवा. ओलसर होणार नाही.
* नारळाच्या घासणीचा अंघोळीच्या वेळी स्क्रबरप्रमाणे छान वापर होतो
* चिंच, लिंबू, आमसूल इत्यादींचा मिठासह वापर केल्यास तांबेपितळाची भांडी घासण्यासाठी छान उपयोग होतो.
* लिंबाच्या फोडी किंवा साली न फेकता कुकरमध्ये टाकल्यास कुकर आतून काळा न पडता स्वच्छ राहतो.
* नारळाच्या काथ्यासारख्या सालीचा भांडी घासण्यासाठी वापर करा.
* तारेच्या घासणीने ॲल्युमिनिअमचा तवा घासल्यानंतर डोसे करताना ते चिकटतात. घासलेल्या तव्यावर प्रथम पोळ्या करून तो थोडा वापरला की डोसे छान होतात.

## सहवेदना

**सौ. सुधा शंकर मराठे यांचे निधन.** श्री. शंकर कृष्णाजी मराठे, दादर यांच्या पत्नी सौ. सुधा शंकर मराठे यांचे दिनांक ९ जानेवारी २०१० ला दु:खद निधन झाले. सौ. सुधाताईंच्या पश्चात नितीन, मिलिंद ही मुले, मुलगी सौ. वृंदा सुनील पेंडसे, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना सौ. सुधाताई आणि शंकररावांची आर्वजून उपस्थिती असायची. माटुंगा येथे दामले योग केंद्राच्या सभागृहात मराठे प्रतिष्ठानच्या वार्षिक कार्यकारिणीसभेत सौ. सुधाताई आणि श्री. शंकरराव मराठे या दाम्पत्याचा सत्कारही अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला होता.

कै. सौ. सुधाताईंना अहेवपणी मरण आले हे विशेष भाग्य. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांना सद्‍गती देवो ही प्रार्थना. मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे ह्यांच्या कै. सुधाताई थोरल्या जाऊ होत्या.

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक १८ डिसेंबरला दुपारी ४ वाजता मराठे उद्योग भवनात (प्रभादेवी) मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची सभा भरली. कार्यवाहांनी मागील इतिवृत्त वाचले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहाराचे वाचन झाले, त्यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. अध्यक्ष आनंदरावांनी 'हितगुज'साठी डी.टी.पी. सौ. अनघा विवेक मराठे करून देतील असे सांगितले. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांनी, सौ. अनघाताईंची मदत घेण्याच मान्य केले. त्याप्रमाणे मार्च 'हितगुज'अंकासाठीचे साहित्य सौ. अनघा मराठे यांच्याकडे डी.टी.पी. करण्यासाठी दिले.

या सभेला विश्वस्त श्रीमती सुलभाताई सुरेशभाऊ मराठे आवर्जून उपस्थित होत्या. त्यांनी खास साजूक तुपातील मेथीचे (गोड) लाडू आणि सँडविच ढोकळा करून आणला होता. त्याचा आस्वाद घेतला. चहापानानंतर सभा संपली.

(पुढील मीटिंगचे आमंत्रण वा. ग. मराठे आणि श्री. मोहनराव मराठे यांनी पुणे येथे येण्यासाठीचे दिले ते सर्वांनी सोयीने दिनांक १५ जानेवारीला जाण्याचे ठरविले.)

**कार्यकारी मंडळ**

शुक्रवारी दिनांक १५ जानेवारी २०१० ला नवीन वर्षातील मराठे प्रतिष्ठानची पहिली बैठक श्री. मोहनराव मराठे, पाषाण, पुणे येथील निवासस्थानी भरली. सभेला उपस्थिती चांगली होती. कुलबांधव, पुणे शाखा कार्यकारिणीतील सदस्य आणि मुंबई मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणी मंडळीतील सदस्य बहुसंख्येने एकत्र जमले होते.

कार्यवाह श्री. हेमंत मराठे, नालासोपारा यांनी अहवालवाचन केले. मागील इतिवृत्त थोडक्यात सांगितले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहाराचे वाचन केले. अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, ठाणे यांनी ८०ग सर्टिफिकेट मिळवण्यासाठी काय व कसे प्रयत्न करावे लागतील यासंबंधी महत्त्वाचे मुद्दे लिहून आणले होते. कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर दामोदर मराठे यांच्याशी चर्चा झाली. त्यांनी ३० जानेवारीच्या आत सर्टिफिकेट मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठीची सर्व खटपट ते करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू असावी त्यासाठी देणग्या मिळवाव्यात, ८०ग कर सवलत मिळाल्यावर कुलबांधवांकडे देणग्या मागता येतील असे सर्वानुमते ठरले.

निर्माणग्रुपचे संचालक श्री. अजित श्रीराम मराठे यांच्याशी दूरध्वनीवरून बोलणे करून मराठे परिवारातील यशस्वी उद्योजकाला पारितोषिक देण्याचे निश्चित करण्यात आले. श्री. अजितकुमार यांनी रु.२१,००० ठेव म्हणून मराठे प्रतिष्ठानकडे दिले आहेत. त्याच्या व्याजातून पारितोषिक दिले जाणार आहे. पारितोषिक प्राप्त मानकरी उद्योजकाचे नावही जाहीर करण्यात आले. दिनांक २६ जानेवारीला श्री. अजितकुमार मराठे यांच्या वडिलांच्या स्मृतीदिनी ते पारितोषिक दिले जाणार आहे. मानपत्र, स्मृतीचिन्ह आणि व्याजातून येणारी ठराविक रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप राहील.

तसेच श्री. ज. गो. मराठे, आगाशी यांनी सौ. नीलांबरीताईंना व सौ. सुमेधाताईंना पाठवलेल्या पत्राविषयी चर्चा झाली. सौ. सुमेधाताईंनी ज. गो. मराठे यांच्या शांकरभाष्य श्री विद्यारण्यविरचित 'श्रीशंकरादिग्विजय' मूळ संस्कृत श्लोकांसहित मराठी अनुवाद या पुस्तकाचे 'नवाकाळ' चे संपादक श्री. नीळकंठ खाडीलकर यांनी केलेले परीक्षण 'हितगुज'मध्ये प्रकाशित करता येईल. सी. गो. खांबेटे ई-मेल करून त्यांना पाठविणार आहेत असे सांगितले. दैनंदिनीविषयी चर्चा झाली. बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टींवर या बैठकीत ऊहापोह झाला. श्री. ह. मो. मराठे यांना कोमसाप तर्फे 'कोकण वैभव' पुरस्कार प्राप्त झाल्याचे कळले.

श्री. मोहनराव व त्यांच्या पत्नी सौ. स्वातीताई यांनी मोठ्या उत्साहाने सर्वांचे स्वागत केले. ताजा, गरम पोह्याचा चिवडा व मिठाई, तीळगूळ आणि कॉफीच्या आस्वादाने सर्वांचा पाहुणचार केला. त्यांचे प्रशस्त घर स्वच्छता, टापटीप घरातील झोपाळा सर्वांनाच आवडला. त्यांच्या घरात सर्वांनी मनसोक्त संचार केला.

श्री. वा. ग. मराठे यांनी इव्हेंटचे फॉर्म भरून घेतले. सर्वांना नवीन वर्षाच्या डायऱ्या व ऑटोरिक्षाचे टेरिफ कार्ड, कॉन्फरन्स पॅड व पेन्सिली भेटम्हणून दिल्या.

मीटिंग संपल्यावर श्री. वा. ग.च्या निवासस्थानी जेवणाची व्यवस्था केली होती. गुळाची पोळी खुसखुशीत होती ती ही मराठ्यांकडूनच मागवली होती हे विशेष. वा. ग. यांचे पुण्यातील निवासस्थान म्हणजे मिनी महाबळेश्वरच वाटले. वा. ग. चे चिरंजीव पुष्कराज आणि सून यांनी पाहुणचारात कुठेही कमतरता ठेवली नाही. त्यांची चिमुरडी गोड मुलगी चि. तेजश्री हिचे कौतुक सर्वांनी के. वा. ग. च्या पत्नी सौ. वृषाली वहिनी ह्यांचा वाढदिवस होता म्हणून बर्थ डे केक कापला. सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

पुढील मीटिंग दिनांक २६ फेब्रुवारी २०१० ला अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, ठाणे येथे त्यांच्या निवासस्थानी घेण्याचे ठरले आणि सभा संपली.

**साभार पोच**

**ओळख अमृतानुभव ग्रंथाची**
(ज्ञानेश्वर महाराज यांचा सार्थ अमृतानुभवग्रंथ)

**लेखक : डॉ. चिंतामणी रा. मराठे,**
संगम प्रेस रस्ता, कोथरूड, पुणे ३८,
दूरध्वनी - ०२०-२५४४९२८७
**पृष्ठसंख्या :** २४
**प्रकाशक :** श्री. प्र. दि. एरंडे, अध्यक्ष गीताधर्म मंडळ, कोथरूड, पुणे ३८
**प्रकाशन :** गीताजयंती, नोव्हेंबर २००९
**किंमत :** १० रुपय;.

**कोणतेही काम करण्यापूर्वी क्षणभर थांबा, त्याचा परिणाम काय होईल याचा विचार करून मगच सुरुवात करा.**

# माहेरच्या अंगणात... जीवन त्यांना कळले हो

श्रीमती कुमुद सुदाम डोके, ठाणे

आमच्या जवळच्या नातलग पणजीबाई काही महिन्यांपूर्वी देवाघरी गेल्या. ही घटना जवळून पाहणारी माझी पाच वर्षांची नात भेटल्यावर निरागसपणे मला म्हणाली, ''आजी, तू जेव्हा देवाघरी जाशील ना तेव्हा डोळे उघडे ठेव, म्हणजे तुला काय हवं काय नको ते दिसेल.'' या माझ्या छकुलीच्या भाबड्या बोलांनी माझे डोळे मात्र खाडकन उघडले व मन:पटलावर अनेक विचारांची कंपने सुरू झाली. स्वत:च्या वयाची साठी ओलांडलेली मी निवृत्त स्त्री म्हणून माझ्या पूर्वायुष्यात भेटलेल्या, मला घडवलेल्या आई, सासू, आजी अशा असंख्य आपापल्यापरीने ज्येष्ठ आणि श्रेष्ठच असलेल्या भारतीय स्त्रियांच्या माझ्या जीवनाला व्यापणाऱ्या प्रसंगांची अक्षरश: जीवनचरित्रे डोळ्यांसमोर फेर धरून नाचू लागली.

पु.लं.च्या अंतूबर्वा छापाची वृत्ती म्हणून जणू प्रसिद्ध असलेल्या खास पुणेरी वातावरणात सदाशिव पेठी संस्कृतीच्या संस्कारात अस्मादिकांचा जन्म स्वांतत्र्योत्तर काळात झाला. मध्यमवर्गीय, किमान गरजा ठेवणाऱ्या, चाकोरीबद्ध आयुष्य जगणाऱ्या सुखी कुटंबात आयुष्याची मदार गाठण्याचा ज्येष्ठापत्याचा मान (दीनवाणा) मला लाभला. आयुष्यभर त्याचा सन्मान राखण्यासाठी मनाची सतत रस्सीखेचही झाली, त्याची ही आत्मकथा, कहाणी वगैरे -

आमच्या घरी कमावणारी व्यक्ती एक अर्थात वडील अण्णा व पाच माणसांचा पंचकोनी प्रपंच. तीन बहिणी, एक भाऊ. जेमतेम दोन खोल्यांमध्ये गावी राहिलेल्या काका, आत्या यांचे मुले शिक्षण, लग्न, आजारपण, उपचार, लग्न जमवून पार पडेपर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या मार्गी लावण्याकरिता वर्षातून अनेकवेळा येत. या सर्वांचे आगत-स्वागत माझी आई हसतमुखाने मनापासून करी. (आईही तिच्या माहेरी ज्येष्ठ कन्या) पुरुषप्रधान संस्कृतीत तिच्या भावभावनांची, दुखण्या-खुपण्याची, हुशारीची, गाण्याच्या आवडीची दखल घेण्याची सवड पुरुषांना नासयचीच. नाही म्हणायला अण्णांनी म्हणजे वडिलांनी स्वत: बातम्या हव्यात, मॅच (क्रिकेट) ऐकायची म्हणून कौतुकाने आणलेला रेडिओ आणून आपल्या राहणीमानात केवढा फरक झालाय हे दाखवण्याची संधी सोडली नाही. कामात हात असले तरी गाण्याची हौस भागवा तुमच्या आईला दिलेला प्रेमळ सल्ला, भेट काहीही म्हणा ना. अशाप्रकारे गाणं शिकणं जमत नाही, पण सणसमारंभात मंगलाष्टक, डोहाळजेवणाची गाणी, मंगळागौरीच्या आरत्या गोड गळ्याने आई म्हणते. हनुमान मंदिरात कीर्तन, बाबूजींचे गीतरामायण आर्वजून ऐकत असे. हा गाण्यात रमण्याचा आनंद तिच्याकडून शिकले. लहान भावंडांना खाऊ घालणं, खेळणं, थोडा अभ्यास घेणं ही तत्कालीन कामं शेजारीपाजारी बटाट्याच्या चाळीतील मानवधर्माला जागणारे सख्खे शेजारी भेटले हे केवढे महाभाग्य.

शालेय शिक्षण म्हणजे त्या वेळेचं ११वी पास (हायर सेकंडक्लास) उत्तीर्ण होऊनही कॉलेजमध्ये जाण्याचा विषय घरात काढला, की अनेक निरुत्साही, अनाहूत सल्ले देण्याची अहमहिका सुरू असे. माझ्या मैत्रिणी कॉलेजात जाण्याच्या गप्पा मारू लागल्या की मी हिरमुसली होई. मुलांना पुढे कॉलेजबिलेज ठीक, मुलींना कशाला एवढं शिकवायचं! शिक्षणाची जिद्द व स्वभावत:च शिकण्याची जबरदस्त हौस यामुळे फार हिरमुसले होई. शेजारच्या कलावंत नार्वेकरकाकांकडून चित्रकलेचे धडे गिरविण्यात मन रमवी. विचार करून करून आईने शेवटी मार्ग काढला व म्हणाली, ''आततायीपणा नको. तू असं का नाही करत एक वर्षाचा कोर्स शिक. तेवढं आपण करू. नोकरी कर आणि बाजूबाजूने कॉलेजही पूर्ण कर. स्वत:च्या पायावर उभी राहून शिकलीस तर ताण पडणारच नाही.'' आईचा हा कटाक्ष, सल्ला आणि तो निभावून नेताना तिने माझ्यावर घेतलेली मेहनत खरोखर बहुमोल आहे. अशा माझ्या आईने मित्रत्वाचे नातेही किती उत्तम निभावले याचा उपभोग मी निवृत्तीवेतन घेऊन स्वत:च्या पायावर उभी राहण्याच्या अवस्थेपर्यंत घेत आहे. डोक्यात राख घालून अविचार न करता धीराने कोर्स पूर्ण करून सकाळी शाळेत नोकरी व दुपारी कॉलेज असे माझे कलाशिक्षण देणे व घेणं पूर्ण करण्याचा अनुभव मी घेतला. सुमारे ४०वर्षापूर्वीचा हा माझा जीवनाभुव राज्यात ए.एम. परिक्षेत ६व्या क्रमांकावर येण्याचा व मुलींमध्ये प्रथम येण्याचा 'भीमपराक्रम' आमच्या हातून घडला त्याचा आनंद अवर्णनीयच. नोकरी केली तरी सर्व पगार वडिलांच्याच हातात. कॉफी व बस खर्चापुरते पैसे काढून घेऊन घरखर्चाला हातभार महत्त्वाचा होता. नुकताच पानशेतचा पुराचा फटका बसल्याने बेघर कुटुंबांना पर्वतीभागात घर बांधून देत होते. अण्णांनी अपार कष्टाने 'तृप्ती' घर बांधले. तोंडचे पाणी हरवून टाकणाऱ्या पानशेत धरणफुटी नुकसानींवर स्वकष्टाची अमृतधारा अनुभवली.

पुढे तारुण्याचा ऐन उमेदीचा काळ, परंतु राहणीमान अत्यंत साधे, नीटनेटके. फॅशन म्हणाल तर स्वकष्टाने घेतलेले लेडिज घड्याळ, लेडीज सायकल. शिक्षकी पेशामुळे शाळा संपल्याबरोबर सुती साडी (मिलची), दोन वेण्या एखादे फूल असा अस्मादिकांचा अवतार असे. फारसं कलाशाखेकडे (आर्ट ड्राईंग पेंटिंग) मुली नसल्यामुळे मी सुट्टीच्या दिवशीही सायकलवरून पुण्याभोवती लँडस्पेकिंग, स्केचिंगला जात असे. त्यामुळे कसं होणार या मुलीचं लग्नाचं अशी उपवर वधू घरात असलेल्या पित्याची चिंताग्रस्त मुद्रा मला बघवत नसे. स्वातंत्र्य आणि समता या विचारांनी पछाडलेल्या मला अखेर हिंमतीने मला आवडेल त्याच्याशी व मला करावंसं वाटेल तेव्हाच मी लग्न करीन हा ठाम निर्धार शब्द शब्द जुळवून ऐकवावा लागला. काहीतरी इतरांपेक्षा वेगळं, आपल्याला आवडणारं, माझ्या कलेला आधार मिळणारं ठिकाण मला हवं होतं.

कलाकार मनस्वी, गुणी, अथक मेहनत व जिद्द असणारा उमदा, मानवतेवर अपार प्रेम करणाऱ्या उंच, देखण्या तत्कालीन तरुणींचे हिरा असलेल्या परंतु माझ्या कलाशिक्षणावर विश्वास

असलेल्या शिक्षण पूर्ण करून नोकरीवर स्वत:ची स्वतंत्र मोहोर उमटवण्याऱ्या सुदाम यांच्याशी प्रेमविवाह केला. स्वत:च्या निवडलेल्या क्षेत्रातील त्याकाळात ते नक्कीच स्वकर्तृत्वाने श्रेष्ठ व ज्येष्ठच होते. अर्थात मित्रमंडळींच्या मदतीने पळून जाऊन लग्न केलं. लहान बहिणींची लग्न माझ्यामुळे होणार नाहीत अशी अवास्तव भीती, हुरहूर मनात सतत टोचे. एका वर्षातच जावयांनी सासऱ्यांचं मन जिंकून, कलेचा कानमंत्र आत्मसात करून कलेकलेने वाढणाऱ्या संसारवेलीला फूल आले. अर्थात ते मलूही ज्येष्ठपत्य ठरले. वयाच्या सहाव्यामहिन्यापासून कोजागिरीच्या चंदामामा पाहिला. पहिले आपले औक्षण अर्थातच वडिलांनी मांडीवर घेऊन झाले. चंद्राची शीतलता, त्याचे आशीर्वाद आपल्या बाळाला मिळो. त्याच्या किरणांनी पवित्र झालेले दूध त्याचे पोषण करो. अशी भावना पौर्णिमेच्या उपचाराची असावी असे मला वाटते. आजपावेतो या औक्षण, नंतर दुग्धप्राशन व पांढऱ्याच रंगाची छोटी भेट यात अंतर पडलेलं नाही. योगायोग चंद्राचे किरण असेच त्याचं नाव सुधांशु. ते ठेवण्यामागे काय विचार झाला होता ते आठवत नाही. तीच प्रभा मुलगी झाल्यावर मुलीमध्ये ती मोठी म्हणून अवलंबण्यात कोठेही दिरंगाई केली नाही.

(क्रमशः)

# बंदी हरी गोपाल

**श्री. अच्युत म. चक्रदेव, पुणे**

बंदी हरी गोपालची गेले दोन दिवस सारखी गडबड, धावपळ चालू होती. याला भेट, त्याला भेट सारखे चालू होते. त्याच्यातर्फे त्याच्या बराकीमधील बंदींना त्याने 'चहापान' ठेवले होते. एवढ्या गडबडीत तो त्याला नेमून दिलेले कामही अगदी मन लावून करत होता. त्याचे बरोबरच्या त्याच्या मित्रांना सहज मी विचारले, ''हरी गोपालची एवढी कसली धावपळ, गडबड चालू आहे?'' त्याचा खास मित्र गोविंद पुरी मला म्हणाला, ''साहेब, तुम्हाला माहीत नाही कमाल आहे. हरी गोपाल परवा त्याची शिक्षा संपवून कारागृहातून सुटणार आहे म्हणूनच त्याची ही धांदल, धावपळ चालू आहे.''

मी त्यानुसार आमच्या नोंदवह्या तपासून पाहिल्या. मला मिळालेली माहिती बरोबर होती. अगदी निव्वळ अठरा वर्षे शिक्षा भोगून गोपाळ सुटणार होता. या संपूर्ण मुदतीत तो संचित अथवा हक्काच्या रजेवर सुटला नव्हता. म्हणजे अठरा वर्षांनंतर तो बाहेरचे जग प्रथमच पाहणार होता. दोन दिवस कसे गेले ते कळलेच नाही. आणि हरी गोपालच्या सुटकेचा दिवस उजाडला. हरी गोपालला सर्वांत आधी मुक्त करावं म्हणून त्याला बोलवणं पाठवलं. पण तो लवकर आलाच नाही. मी बाकीच्या तीन-चार बंदींना मुक्त केले व माझी अन्य कामे करीत राहिलो. मध्येच दोन-तीनदा मी हरी गोपालला बोलावलं, पण तो आलाच नाही. मी माझ्या ठरलेल्या वेळी जेवायला गेलो. जेऊन परत कामावर आलो आणि ताबडतोब मी हरी गोपालला बोलावणे पाठवले, पण तो लवकर येईना म्हणून मी आमचे रक्षकास (शिपाई) त्यास सक्तीने घेऊन यायला सांगितले.

शेवटी तो आला. मी त्याचे संबंधीच्या सर्व नोंदी नोंदवह्यात पुन्हा तपासल्या. त्याचे अंगावरील खुणा (जखमा, तीळ इ.) नियमाप्रमाणे तपासल्या. त्याला त्याचे खाजगी कपडे घालायला दिले. सही करून त्याचे मुक्ततेचे पत्रक त्याचेकडे दिले. व त्याचे जमा पैसे त्याला द्यावे म्हणून नोंदवही पाहू लागलो तोच काय आश्चर्य हरी गोपाल माझे पायावर गडाबडा लोळत रडवेला आवाज काढून म्हणाला, ''साहेब, मी बाहेर जाणार नाही. मला इथेच ठेवा. माझं उरलेलं आयुष्य मी जेलमध्येच काढीन. मला इथेच राहू द्या. माझ्यावर एवढी कृपा करा, दया करा.'' तो मुसमुसून रडत होता. शेवटी मी कसेबसे त्याला शांत केले व त्याला उठवले. मी त्याला विचारले, ''अरे कोणीही बंदी याच दिवसाची वाट पाहत असतो. त्यासाठी तो जास्तीत जास्त माफी मिळवण्याचा प्रयत्न करतो. आणि तू आज असा जगावेगळा हट्ट का करतो आहेस?''

तेव्हा तो म्हणाला, ''साहेब, इतर बंदींचं बराबेरच आहे ते ताबडतोब त्यांचे घरी जातात, पण मी कोठे जाऊ? मला घरदार काही नाही. आईवडिलांनी मला शिक्षा झाल्यावर एक-दोन महिन्यातच माझ्या काळजीने जगाचा निरोप घेतला. भाऊ माझ्यावर नाराज आहेत. इतक्या वर्षांत त्यांचेकडून मला एकही निरोप, चिठ्ठी काही नाही. भावांचे कुटुंबांविषयी मला काही माहिती नाही. बाहेरचे जग इतके वर्षांत मी बघितलेच नाही. माझा कसा निभाव लागणार? बाहेर फसवाफसवी आहे असं म्हणतात. मी फार, फार गोंधळून गेलो आहे. मी इथेच तुम्ही म्हणाल तितकं चांगलं काम करीन. मला पगार वगैरे काही नको. मी कसलीही तक्रार करणार नाही. हवं तर लिहून देतो.'' सकाळपासून तो लवकर का येत नव्हता, त्याचा असा उलगडा झाला.

मी त्याला म्हणालो, ''आम्हाला तुला असे बेकायदेशीरपणे कारागृहात ठेवता येणार नाही. तसे ठेवले तर आम्हालाच शिक्षा होईल. तुला कुठे आश्रमात ठेवता येईल का ते मी पाहतो. मुक्त होऊन तुला बाहेर यायलाच पाहिजे.'' मी भराभर दोन-चार ठिकाणी दूरध्वनी लावले. हरी गोपालची वागणूक अतिशय चांगली आहे, तो प्रामाणिक आहे हे मी निक्षून सांगितले. तेव्हा एका संस्थेने तयारी दर्शवली. त्यांनी त्यांची गाडी व बरोबर चार माणसं पाठवली. हरी गोपाल ढसाढसा रडत कारागृहाबाहेर पडला. कारागृहाचे मुख्य दरवाज्याबाहेर पडताच त्याने कारागृहाकडे पाहून तीनदा साष्टांग नमस्कार घातले व आश्रमाची माणसे त्याला गाडीतून आश्रमाकडे घेऊन गेली.

**- अच्युत म. चक्रदेव**

कारागृह अधिक्षक (निवृत्त) पुणे.

## नांदा सौख्यभरे

श्री. मोहन मधुसूदन मराठे, रा. पुणे यांचे ज्येष्ठ पुत्र चि. भालचंद्र (बी.कॉम, एमसीए.) यांचा विवाह दि. १२-१२-२००९ रोजी चि. सौ. कां. प्राची कोकिळ (बी.कॉम., एमसीए.) हिच्याशी झाला. सौ. प्राची श्री. श्रीपाद कोकिळ यांची ज्येष्ठ कन्या आहे. तसेच ती एक चांगली गायिका आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!

।। जय स्वतंत्रते भगवते ।।

कालिदास बा. मराठे
श्री २१०,ढवळी
पो. कवळे, ता. फोंडा
दि. १२.१.२०१०
स्वामी विवेकानंद जयंती

श्री. माननीय संपादिका ‘हितगुज’
यांसी
स.न.

श्री. ज. गो. मराठे यांनी लिहिलेल्या व अनुवादित केलेल्या ‘श्री शंकर दिग्विजय’ या पुस्तकाचा थोडक्यात परिचय खाली देत आहे. आपणास योग्य वाटल्यास ‘हितगुज’च्या पुढील अंकात प्रसिद्धी द्यावी ही विनंती

आपला विश्वासू
कालिदास बा. मराठे (पृ. ५४१)

## अमृतमहोत्सवी वर्षात श्री. जनार्दन गोविंद यांचे महान कार्य

मूळचे कोकणातील वेंगुर्ले तालुक्यातील आपले कुलबांधव श्री. जनार्दन गोविंद यांनी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. आणि इतक्या वर्षातील चिंतनानंतर श्री. विद्यारण्य स्वामींनी मूळ संस्कृत भाषेत लिहिलेल्या आद्य शंकराचार्यांच्या चरित्राचे मराठीत ‘श्री शंकर दिग्विजय’ या नावाने अप्रतिम अनुवाद करून सर्व मराठी भाषिकांना एक महान भेट दिली आहे, त्याबद्दल आपण साऱ्या कुलबांधवांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे. खरे तर साऱ्याच मराठी भाषिकांनी त्यांचे या कामाबद्दल कौतुक केले पाहिजे. अर्थात ते काम ‘नवा काळ’ कार श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी नवाकाळच्या ३१ ऑगस्ट २००९ च्या अंकात खास अग्रलेख लिहून केले आहे.

श्री. जनार्दनकाकांनी स्वखर्चाने श्री. मुकुंद जोग यांच्या सहकार्याने हा ग्रंथ सिद्ध केला आहे ज्याचे मूल्य रुपये ५०० असले तरी सर्वांच्या घरात हा ग्रंथ जावा यासाठी रुपये ३००मध्ये देण्याची व्यवस्था केली आहे.

या त्यांच्या उदार वृत्तीला आपण साऱ्यांनी कुटुंबासाठी व आपल्या इष्टमित्रांना सांगून एकेक प्रत देऊन प्रतिसाद दिला पाहिजे. ऑगस्ट २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्याच या ग्रंथाची आपल्या मुखपत्रात दखल घेतली गेली नाही याचे आश्चर्य वाटते.

तरी सर्व कुलबांधवांना विनंती करितो की, श्री. ज. गो. मराठे ३०४. अ, रिद्धीसिद्धी अपार्टमेंट, पद्मणनगर आगाशी, जि. ठाणे ४०१ ३०१ दूरध्वनी: ०२५०- २५८८६९५ या पत्त्यावर संपर्क साधून हा दुर्मिळ ग्रंथ मिळवावा.

कालिदास बा. मराठे
श्री २१०, ढवळी
फोंडा, गोवा ४०३ ४०१
दूरध्वनी : ०८२- २३१३८०५

श्री आदरणीय श्री. ज. गो. मराठे, आगाशी यांनी लिहिलेल्या ‘श्री शंकर दिग्विजय’ या ग्रंथाची साभारपोच ‘हितगुज’ सप्टेंबर २००९ च्या अंकात पृष्ठ ४ वर चौकटीत प्रकाशित केली आहे. कृपया याची नोंद घ्यावी.
- संपादिका

**तासभराचे ध्यान हे वर्षभर केलेल्या पूजेअर्चेहून श्रेष्ठ होय.**

# आत्महत्या

**सौ. ललिता विजय मराठे (पृ. ३९०)**

५ जानेवारीचे वर्तमानपत्र उघडले व पहिल्याच पानावर तीन वेगवेगळ्या वयोगटातील मुलींनी आत्महत्या केल्यची सविस्तर माहिती वाचली. ६ तारखेला तर आणखी ६ मुलांनी आत्महत्या केल्याचे वृत्त होते. हे असे का घडते, हा प्रश्न अनेकांच्या मनात आला, तसाच तो माझ्याही मनात आला.

या प्रश्नाचे उत्तर माणसागणिक वेगळे आहे, पण ढोबळमानाने सांगायचे झाल्यास एकटेपणा, नाकारलेपणाची भावना, नैराश्य, न्यूनगंड, हताशपणा आणि असहाय्यतेची भावना ही मुख्य कारणे आहेत.

असे होऊ नये म्हणून यात पालकांची, शिक्षकांची, समाजाची सर्वांची जबाबदारी आहे. पण म्हणून सर्वांत जास्त जबाबदारी पालकांची आहे. आज मुळात पालकच भयग्रस्त आहेत. त्यांच्या पुढे अनेक प्रश्न आहेत. मूल जन्माला आल्यापासूनच प्रश्नांना सुरुवात होते. त्याला चांगल्या (आपल्या प्रतिष्ठेला शोभेल अशी) शाळेत प्रवेश मिळेल का? त्याची 'अ' तुकडी कायम राहील का? इथपासून तोा कोणी तरी मोठा म्हणजे डॉक्टर, इंजिनिअर होईल का? या प्रश्नांच्या गुंत्यात पालक गुरफटला जातो व पाल्यांकडून सतत चांगल्या मार्कांची अपेक्षा करतो यात त्याची आवड, कल, त्याची क्षमता (शारीरिक व मानसिक) या गोष्टींकडे तो लक्ष देत नाही. पाल्याच्या डोक्यावरील अपेक्षांचे ओझे वाढत जाते. यातून मूल व आईवडिल यांच्यातील ताण वाढत जातो व यातून अनेक समस्या निर्माण होतात. या संदर्भात माझ्या वाचनात खलील जिब्रान यांची एक कविता आली. मला वाटते ती पालकांना मार्गदर्शन करणारी आहे. मला ती कविता खूप आवडली, भावली तुम्हालाही आवडेल

*तुमची मुले तुमची नसतात,*
*ती तर असतात जीवनाच्या वंशवेलीची फळफुले?*
*ती जरी तुमच्यामधून आलेली असली,*
*तरी ती तुमच्यापासून आलेली नसतात,*
*आणि जरी ती तुमच्याजवळ असली,*
*तरी ती तुमची नसतातच ॥१॥*

*फार तर तुम्ही त्यांना तुमचे प्रेम देऊ शकता,*
*पण ना तुमचे विचार!*
*कारण त्यांना त्यांचे स्वतंत्र विचार असतात*
*तुम्ही त्यांच्या शरीराला स्वतंत्र घर देऊ शकाल*
*पण ना त्यांच्या आत्म्याला ॥२॥*

*कारण त्यांचा आत्मा राहत असतो उद्याच्या घरात*
*जिथे तुम्ही पोहोचू शकणार नाही,*
*तुमच्या स्वप्नातदेखील*
*तुम्ही फार तर त्यांच्यासारखे बनण्याचा*
*प्रयत्न करायला हरकत नाही॥३॥*

*कारण जीवनरूपी घड्याळाचे काटे*
*कधीच उलटे फिरत नाहीत.*
*की जीवन कधी काळाच्या*
*थाव्यांवर रेंगाळत नाही॥४॥*

*तुम्ही धनुष्य आहात जिथून तुमची*
*मुले सजीव बाणासारखी सुटतात*
*त्या धनुर्धाऱ्याच्या हातातील तुमचे हे वाकणे*
*सगळ्यांना सुखदायी ठरू द्या॥५॥*

- खलील जिब्रान

**- सौ. ललिता विजय मराठे** (पृ. ३९०)

## सहवेदना



**श्री. सुधाकर बळवंत मराठे (पृ.१२९) :** माझे काका : त्यांचा जन्म वाई येथे झाला. मराठे परिवारातील सर्वांत वयस्कर व्यक्ती. आज त्यांचे वय ८१ वर्षांचे आहे. त्यांचे शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे झाले. त्यांचे शिक्षण बी.एस्सीपर्यंत झाले असून त्यांनी गोरेगाव येथील सिबा कंपनीत नोकरी केली. त्यांचे ठाणे येथे वास्तव्य आहे. माझ्या आजीचा सर्वांत लाडका मुलगा. त्यांनी सर्व मराठे परिवारास आधार व आर्थिक मदत केली. त्यांनी आजीकडे तसेच आपल्या भावंडांकडे, बहिणींकडे व पुतण्यांकडे जातीने लक्ष दिले. या त्यांच्या कार्यात माझ्या काकूंनी त्यांना उत्तम साथ दिली. त्यांना एक मुलगा असून तो मुंबईत प्राध्यापक आहे व अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष आहे. त्यांना दोन नातू आहेत. माझ्या वडिलांच्या आजारपणात त्यांनी जातीने लक्ष घालून आम्हाला आधार दिला. माझ्या धाकट्या भावाच्या लग्नात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांचा स्वभाव शांत आहे. त्यांची सून सुस्वभावी असून मुंबई महानगरपालिका येथे नोकरी करत आहे. माझे सर्वात आवडते काका

कळवण्यास अत्यंत वाईट वाटत आहे की माझे काका श्री. सुधाकर बळवंत मराठे वय वर्षे ८१, राहणार ठाणे यांचे ठाणे येथे २८-१-२०१० ला हृदयविकाराच्या धक्क्याने दु:खद निध् झाले. ते अनेक वर्षे मराठे प्रतिष्ठानचे १९८८ ते २०००सालापर्यंत काम करत होते. नवीन सभासद नोंदणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. ते सीजेबीए कंपनीत नोकरीला होते. ते संघाचे कार्यकर्ते होते, तसेच विद्यार्थी परिषदेला योग्य ते मार्गदर्शन करत असत. त्यांच्या पश्चात त्यांना एक मुलगा श्री. मिलिंद सुधाकर मराठे, अध्यक्ष अखिल भारतीय विद्यार्थी परिषद असून त्यांची सून सौ. सुजाता व त्यांना २ नातू व पत्नी श्रीमती प्रतिभा मराठे आहेत. ते माझे व श्री. सतीश मराठे यांचे दादा होते व आमच्या सर्व मराठे परिवाराला वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन केले आहे.

**प्रेषक - श्री. गजानन मराठे, पुणे (पृ. १२९)**

## हसा लेको!

मुली मुलांपेक्षा हुशार असतात यात वादच नाही.

ज्येष्ठ इतिहास संशोधक दत्तो वामन पोतदार हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना दीक्षांत समारंभात म्हणाले, ''मेरिट लिस्ट बघितल्यावर असं दिसतंय की यावेळी मेरिटमध्ये येणाऱ्या मुलींची संख्या मुलांपेक्षा खूप जास्त आहे. म्हणजे मुली मुलांपेक्षा हुशार आहेत.''

हे ऐकताच मुलींनी जोरदार टाळ्यांचा कडकडाट केला.

दत्तो वामन पुढे म्हणाले, ''पण मुलांनी नाराज व्हायचं कारण नाही. कारण या हुशार मुली शेवटी तुम्हालाच मिळणार आहेत!!!''

# रक्त

**श्री. वामन गणेश मराठे (पृ. ५०३)**

रक्त पाहण्यासाठी जखम होणे जरूरीचे आहे. ज्याला रक्त माहीत नाही असा माणूस विरळच. रक्ताचा थेंब लहान असला तरी त्याचा रंग लालच असतो आणि तो आपले गुणधर्मही सांगत असतो, दाखवत असतो. ह्या थेंबाचेच पुढे मोठमोठ्या घटनात रूपांतर होते. रक्तलांछित, रक्तपिपासू, रक्ताचे डाग, रक्ताचा सडा, रक्तरंजित क्रांती, रणकंदन, शिरकाण, तसेच काही वाङ्मयीन शब्दही, डोके फोडणे, खून, मारामाऱ्या, एवढंच काय तर आधुनिक वजनदार शब्द ''बॉम्बस्फोट'' घात, अपघात रोजचेच आहेत. त्याला मर्यादा नाहीच मुळी. आपल्या सगळ्यांचे रक्ताचे नाते, देशाशी आहे, समाजाशी आहे, आपल्या कुटुंबाशी आहे, एवढंच काय तर पिढ्यान्‌पिढ्यांचेही आहे म्हणूनच बीजपेशींचच्या बँकाही निघाल्या आहेत. ह्याला कारण आपली असूया, स्वार्थ, शेखी पुढील काही पिढ्यांत माझ्याच रक्ताचा वंश निर्माण व्हायला हवा असा इगोसुद्धा! ह्यात भावना, आपुलकी किंवा महत्त्वाकांक्षाही असू शकेल, मग ती आसुरी असो की इच्छा असो.

रक्त हे देणे घेणे होऊ शकते, प्राण घेणे तसे प्राण देणेही जीवनदानही ठरते. इथे स्वार्थाप्रमाणे परमार्थही होऊ शकतो. खरं पाहता रक्त हे शुद्ध व पवित्र असते, परंतु आपण मनुष्य मात्र त्याला अशुद्ध व अपवित्र बनवत असतो. ह्याचे कारण दया, माया, आपुलकी व द्वेष होय. उदा. प्रेमसंबंध, मैत्री, भावनिक, समाजातली प्रतिष्ठा, श्रीमंती व गरिबी आणि छंद, प्रौढी वगैरे. स्पर्धासुद्धा, नैराश्यही येऊन आत्महत्या करणेचे व माणूसकीला काळिमा फासणरे प्रकार तर रोजच वाचावयास, ऐकावयास मिळतात, कारण जीवघेण्या स्पर्धा. स्पर्धा ह्या पूर्वी खेळांच्या, परीक्षांच्या बौद्धिक व शारीरिक स्वरूपाच्या असत. आता तर मेरिट, स्टेटस, क्रेझ, हायफाय सोसायटी, नाहक परदेशी आकर्षण, फॅशन, फॅमिली सिंबॉल वगैरे वगैरे

खरं पाहता रक्ताला धर्म, जात, देश आड येत नाही. स्त्री-पुरुष हा भेद नाही तर ते शुद्धतेने व कुठल्याही दुसऱ्या रंगांपेक्षा लालच दिसले पाहिजे तरच ते ''रक्तं लंबोदरम्'' होऊ शकते.


- श्री. वामन गणेश मराठे, (पृ. ५०३)

C/o श्री. पुष्पराज वामन मराठे, सी ७०३,
पद्मविलास अपार्टमेंट, 'अथश्री'जवळ, बाणेर,
पाषाण-लिंक रोड, पुणे ४११०२१


## सहवेदना

**श्री. सदानंद कृष्णाजी मराठे** शिक्षणासाठी कोल्हापूर येथून हुबळी(कर्नाटक) येथे आले आणि डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग पूर्ण करून बिल्डिंग कन्स्ट्रक्शनचा स्वत:चा व्यवसाय सुरू केला व अल्पावधीतच स्वत:चे स्थान निर्माण केले. त्यांची इतरांना मदत करण्याची वृत्ती होती. लोकांच्या समस्या सोडविण्यात त्यांना आनंद मिळत असे. ह्याच त्यांच्या स्वभावामुळे ते हुबळी युथ वेल्फेअर ट्रस्ट व एन.एल.ई ह्या मोठ्या शिक्षण संस्थचे एम.डी व सेक्रेटरी होत. त्यांनी २५ वर्षे हुबळी अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमनपद भूषविले होते. ह्या२५ वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांनी अनेक अडचणींना तोंड देत बँकेची भरभराट केली.

नावाप्रमाणे सदैव हसतमुख असणारे, कर्तृत्वना, धडाडीचे व शिस्तप्रिय असे आमचे बाबा ती. सदानंद कृष्णाजी मराठे वयाच्या ७१-७२ वर्षी अचानकपणे २९ ऑक्टोबर, २००९ ह्या दिवशी स्वर्गवासी झाले. त्यांच्या निधनाने अनेकांचा आधारच नाहीसा झाला आहे. त्यांच्यामागे पत्नी, ३ विवाहित कन्या व १ विवाहीत मुलगा आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.

- हरीश मराठे, हुबळी

## आवाहन

मी आनंद नारायण मराठे, ८ ऑर्किड अपार्टमेंट, लेन ९, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ३८, दूरध्वनी ९६६५३८१८०७ / ९६७३९९८०३०

मी सध्या लाईफ ॲडव्हायसर म्हणून कोटक लाईफ इन्शुरन्समध्ये कार्यरत असून, आजपर्यंत अनेक कुटुंबांच्या फायद्यासाठी, चांगल्या पॉलिसीज देऊन त्यावर सुरक्षिततेची हमी व गॅरंटी रिटर्न देऊ केलेले आहे.

कोटकमध्ये अनेक चांगल्या गुंतवणुकीच्या योजना आहेत ज्या तुमचा फायदा आणि फायदाच करतील. माझ्या मतानुसार ह्या क्षेत्रता कार्य करणे हे अतिशय नोबल कॉज आहे. आपणासही या योजनेचा लाभ व्हावा ही सदिच्छा.

काही योजना पुढीलप्रमाणे आहेत

१. लहान मुलांसाठी, २. निवृत्ती धारक, ३. संपूर्ण जीवन, ४. ट्रिपल बेनिफिट गॅरेंटेड रिटर्न, ५. शैक्षणिक इत्यादि.

श्री. आनंद मराठे हे ना. बा. मराठे (पूर्वी कलकत्त्याला होते) त्यांचा मुलगा आहे.

# ।। जागृत देव श्री. सिद्धेश्वर।।

**श्री. गोविंद मराठे, गोवा (पृ. ५४१)**

प्रारंभी देवाधिदेव श्री. महागणपतीला त्रिवार प्रणिपात करून, सिद्धेश्वरचया चरणी डोके ठेवून, त्याने शक्ती व बुद्धी दिल्याप्रमाणे समस्त भक्तगणांच्या आशीर्वादाने श्री. सिद्धेश्वराविषयी दोन शब्द अल्पमती व अल्पबुद्धीने लिहित आहे. कमी किंवा अधिक असल्यसा क्षमा असावी ही प्रेमळ व नम्र विनंती करतो.

जगातील सर्व धर्मात सनातन हिंदू धर्म हा सगळ्याच बाबतीत सर्वश्रेष्ठ गणला जातो. त्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. हा धर्म सर्व धर्मांना समान मानतो आणि तो हिंदुस्थानांतच उगम पावला. चालरिती, परंपरा, व्रतवैकल्ये, आचार-विचार, राहणीमान, विवाह बंधने, एक पत्नी हे खास प्रकार इतर कोणत्याही धर्मात पहावयास मिळत नाहीत. हिंदू धर्म हा इतर धर्मियांचा मार्गदर्शक आहे. आमच्या सनातनधर्मात फरक एवढाच की इतर धर्म एकाच परमेश्वराला मानतात तो निराकार असतो. या उलट आमच्या हिंदू धर्मात श्री गणेश, श्री हनुमान, श्रीराम, श्री दत्तात्रय तसेच श्री. महालक्ष्मी, शांतादुर्गा, श्री. योगेश्वरी इत्यादी देव व देवता लाखो ठिकाणी पूजल्या/मानल्या जातात.

आता मी सुर्लदेऊळवाड्यावरील श्री. सिद्धेश्वर व श्री. नवदुर्गा देवस्थानाविषयी विवेचन करणार आहे. वरील देवस्थाने साधारणपणे उसगावचा म्हादईपूल ते साखळी या महामार्गाच्या मध्यावर आहेत म्हटल्यास वावगे होणार नाही. तिथे फोंडा ते साखळी व साखळी ते फोंडा या बसने, टॅक्सीने, मोटार सायकलने अथवा स्वत:च्या वाहनाने जाता येते. सभोवार गर्द झाडी होती. कालपरत्वे खनिज उद्योगामुळे रस्ते व घरेदारे लालेलाल झाली आहेत. कालाय तस्मै नम:. आजूबाजूची शेते ओस पडली आहेत. सुपारी बागायतीतही दम राहिला नाही. तरीसुद्धा जो तो वेळेचे भान ठेवून, उद्योग व्यवसाय सांभाळू, निरपेक्ष मनाने श्री. सिद्धेश्वर व श्री नवदुर्गेची करुणा भाकतो आहे.

सुर्लाचे हे देवस्थान परिसर देऊळवाडा म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी ग्राम पंचायत असून, सभोवार अनेक वाडे आहेत. म्हणूनच हा देव इतर वाड्यांवरील देवदेवतांचे शिखर असावे. या ठिकाणी शंभरहून अधिक वर्षांपासून, महारुद्र-नवचंडी अनुष्ठान सेवा अखंडपणे चालू असून त्यात वर्षागणिक उत्सवात वाढ होत आहे. ते दिवस म्हणजे पौष महिन्यातील शेवटचा रविवार व सोमवार असतो. हे वर्ष सिद्धेश्वर ट्रस्टचे रौप्य महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त दि. ७ जानेवारी ते ११ जानेवारी २०१० पर्यंत पाच दिवसांच्या भरगच्च विशेष कार्यक्रमाने तसेच संगीत, गीत, वाद्य, नृत्य, कीर्तन, प्रवचन या सर्वांगसुंदर कार्यक्रमाने संपन्न होणार आहे. याबद्दल माझ्याप्रमाणेच समस्त भक्तांना अत्यानंद होत आहे. ट्रस्टने आवाहन केल्याप्रमाणे, भक्त आर्थिक, श्रमिक व बौद्धिक वस्तूरूपाने देणगी, जाहिराती-द्वारासुद्धा मदत करू शकतात.

या पंचक्रोशीत अनेक नररत्ने जन्मास आली. कै. वे. शा. सं. कृष्णशास्त्री केळकर, कै. गोविंदराव गाडगीळ, माजी आयकर कमिशनर तसेच डॉक्टर, वकील, शिक्षक, बागायतदार, शेतकरी व नाना कलाकार याचे ऋण या गावावर आहे.

हे देवस्थान बरीच वर्षे जीर्ण अवस्थेत होते, पण सिद्धेश्वर व श्री नवदुर्गेच्या प्रेरणेने, श्री. लक्ष्मीकांत सुर्लकर (माजी आमदार), व साळगावकर कंपनी यांनी भव्य सभामंडप व सिद्धेश्वर व नवदुर्गा मंदिराचा कायापालट केला. आजचे रूप हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. या मंदिराला सुमारे पाचशे वर्षांचा इतिहास असावा असे जाणकार सांगतात.

हे देवस्थान स्वंयभू असून नवसाला पावणारे आहे याची अनुभूती आमच्या कुटुंबाला आली आहे, हे मी नमूद करतो. त्या अनुभूतीची पूर्तता व प्रेरणास्थान होते कै. वासुदेवकाका वझे, त्यांचेच पुत्र सिद्धेश्वर चरणी सेवा करत आहेत. त्यांचे वैशिष्ट्य हे होते, की त्यांनी देवाला साकडे घालून भक्तांचे मनोरथ पूर्ण कर म्हटले की योगायोग शंभत प्रतिशत जुळून येई. सिद्धेश्वर व श्री नवदुर्गेची करुणा भाका व यथामती यथाशक्ती तपश्चर्या करा व निश्चिंत राहा.

आपल्या गोव्यात अनेक नास्तिक, देव नाही म्हणणारे लोक आहेत, पण तेच लोग संकटकाळी देवा तूच माझा आधार आहेस असे म्हणतातच. माणसाने देवावर जरूर श्रद्धा ठेवावी. अंधश्रद्धेवर विश्वास ठेवू नये. परमेश्वराची भक्ती निरपेक्षपणे करा आज ना उद्या तो यथोचित फळ देईलच. पाच दिवस चालणारे हे महान धर्म व देवकार्य करण्यासाठी ट्रस्टच्या चालकांना, श्री सिद्धेश्वर व श्री नवदुर्गा आर्थिक, श्रमिक, बौद्धिक सुयश देवो व सेवा यथासांग घडो ही माझी प्रार्थना. या सोहळ्यास, माझ्या कुटुंबाच्या शुभेच्छा.

- **श्री. गोविंद मराठे,** गोवा (पृ. ५४१)

## अभिनंदन!

**किरात दिवाळी अंकाला पुरस्कार, संपादक : श्रीधर केशव मराठे**

साहित्य विचार मंथन, कल्याण, जि. ठाणे ही संस्था दरवर्षी दिवाळी अंकांचे प्रदर्शन व स्पर्धा भरविते. यंदा संस्थेच्या दशकपूर्ती वर्षानिमित्ताने आयोजित केलेल्या स्पर्धेत राज्यभरातून आलेल्या दिवाळी अंकांतून १५ अंकांची उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून निवड करण्यात आली. त्यामध्ये 'किरात' दिवाळी अंक २००९ चा समावेश आहे. १६ डिसेंबरला या पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. किरातच्या वतीने यंदाच्या दिवाळी अंकाचे उत्कृष्ट मुखपृष्ठ साकारणारे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबईचे प्राध्यापक सुनील नांदोसकरांनी हा पुरस्कार स्वीकारला.

प्रदर्शनानंतर वरील संस्था सीमेवरील जवानांना तसेच अनेक गरजू संस्थांना दिवाळी अंकांचे वितरण करते. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्रीधर केशव मराठे यांचे अभिनंदन!

**बुद्धी आणि भावना यांचा समन्वय म्हणजे विवेक**

## मानसन्मान




*(डावीकडून) मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह वियजकुमार बांदल, अ. स. मराठे, दत्ता पाटील व पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रसाद मोकाशी* →


**मुंबई पत्रकार संघातर्फे २ जानेवारी २०१० रोजी आझाद मैदानावरील पत्रकार भवनात ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. मराठे परिवारातील श्री. अनंत सदाशिव मराठे यांचाही यावेळी बहुमान करण्यात येऊन विरोधी पक्षनेते दत्ता पाटील यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफल. पुष्पगुच्छ व पत्रकार संघाचे मानचिन्ह आणि रुपये अकरा हजार एकशे अकराचा धनादेश अर्पण करण्यात आला. श्री. मराठे यांनी तेवढीच भर घालून धनादेश पत्रकार संघाला परत केला.**

**श्री. मराठे (वय ८५ वर्षे) यांनी आजवरच्या आयुष्यातील निम्मा काल मराठी पत्रकारितेत घालवला. त्यांनी इंग्लंडमध्ये १९६७ साली उच्च पत्रकारितेचे शिक्षण घेतले. नाशिकच्या 'गावकरी'तून १९४६ साठी प्रारंभ करून ते १९८८ मध्ये 'महाराष्ट्र टाईम्स'च्या सिनियर असिस्टंट एडिटर या पदावरून २६ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ऐन भरात असताना १९५६ ते १९६२ या काळात आचार्य अत्रे यांच्याबरोबर काम करण्याचे भाग्य त्यांना लाभले.**

**मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. अ. स. मराठे यांचे हार्दिक अभिनंदन!**

---

## पुस्तक प्रकाशन



*(डावीकडून) संस्थेचे सेक्रेटरी श्री. कन्सल अध्यक्ष श्री. घनश्यामभाई अमिन व श्री. मोहन मराठे.* ←

**इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन ह्या संस्थेसाठी कोऑपरेटिव्ह हिस्टरी सेरीज मध्ये पहिले पुस्तक श्री. मोहन मराठे (पृ. ३६५) ह्यांनी लिहिले. त्याचा प्रकाशन समारंभ दिनांक २० डिसेंबर, २००९ रोजी संस्थेच्या वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूटमधील हॉलमध्ये, संस्थेचे व 'नॅशनल को-ऑप. युनियन ऑफ इंडिया' चे अध्यक्ष श्री. घनश्यामभाई अमिन ह्यांचे हस्ते झाले.**

# प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


BOOK POST

If undelivered, please return to

**संपादिका : ‘हितगुज’**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, या शुभेच्छा!


त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.


पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in वेबसाईट: www.marathepratishthan.org